
स. प्र. म. ठाणे
REFBK-0004304

# गोमांतक-वर्णन.

( एकंदर पृष्ठें ९२, ११ महालांची त्रोटक माहिती. )



किंमत ४ आणे.

ठाणे, ॥ श्री ... वंदे ॥
... ठाणे.

# गोमांतक वर्णन.

( गोव्यांच्या ११ ही तालुक्यांतील मुख्य गांव, तेथील संस्था व त्यांचे कार्यवाह, देवालयें वगैरेसंबंधीं साग्र माहिती. )

लेखक

त्र्यं. वि. वैद्य, कुकळी--गोवा.

४३०४

मुद्रक व प्रकाशक.

दत्तात्रेय गोविंद सडेकर,

प्रो. धनंजयप्रेस—खानापुर.

एप्रील १९३०

( सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन. )

REF3K-0004304

# दोन शब्द.

महाजनांच्या गांठीभेटी होण्यास हें एक सर्वोत्कृष्ट साधन समजून व त्यांच्याच उदार आश्रयानें या चिमुकल्या पुस्तकाचा गौरव होईल असें जाणून अल्पमोली असें हें वर्णन या आनंदपर्वणीच्या वेळीं सूज्ञांपुढें ठेवीत आहे. याला प्रेमळांत:करणाच्या गोमांतकस्थ बंधूंनीं आणि साहित्यसंमेलनाकारितां जमलेल्या विद्वान, उदार व गुणज्ञ सरस्वतीभक्तांनीं थोरमनानें आश्रय दिल्यास दुसरी आवृत्ती फारच सुधारणांनीं अलंकृत अशी लौकरच प्रसिद्ध होईल. श्रीराधादामोदर काय करील तें खरें!

या पुस्तकाचे लेखक श्री. व्यं० वि० वैद्य हे गोमांतकचे प्रसिद्ध कलमबहाद्दर आहेत. अलीकडे वाङ्मयक्षेत्रांत त्यांची लेखणी फारच उत्कृष्ट कार्य करीत आहे. अगदीं थोड्या मुदतींत त्यांनीं अत्यंत परिश्रमपूर्वक निरपेक्षपणानें हें पुस्तक लिहून पाठविल्याबद्दल मित्र त्यांचा अत्यंत आभारी आहे. परमात्मा सर्वांस सुखांत ठेवो.

खानापूर.
ता. १-५-३०

नम्र,
द० गो० सडेकर.

# अनुक्रमणिका.

भौगोलिक माहिती व देशपरिचय पृष्ठ १ ते ४-

**१ काणकोणमहाल** पृष्ठ ४ ते १३—लोलयें, केशवाचें देऊळ, निराकाराचें देऊळ, मुष्टिफंडसंस्था, पैंगिण, पर्तगाळ, काणकोण, तर्पण, खोलगड.

**२ चंद्रवाडी व बाळ्ळीमहाल** पृष्ठ १३ ते २१—करमलघाट, फातर्फे, शारदासेवकमंडळ, होर्णे, बाळी, अडणे, केपें भारतकार्यालय, बालोन्नतिसमाज, चंद्रेश्वर, काकोडें, सावर्डें.

**३ साष्टीमहाल** पृष्ठ २२ ते ३७—कुंकळी, ज्ञानप्रसारकसमाज, चित्रकला व शिल्पकला, वास्तुकला, असोळणें, वास्तुशास्त्र मडगांव, हिंदुसभा, सारस्वतब्राह्मणसमाज, युवकसंघ, दैवज्ञब्राह्मणसमाज, श्रीविठ्ठलमंदिर, श्रीदामोदरविद्याभुवन, हिंदुकार्यालय, सरस्वतिसेवकमंडळ, ओस्पीस, बाणावली, सत्योन्नतिसमाज, सूर्यसरोवर, वरेण्य, राय, चिंचोणे, रायतूर.

**४ सांगेमहाल** पृष्ठ ३८ ते ४३ —दूधसागर, कुळें, सांगे, आर्यविज्ञानकार्यालय, विठ्ठलसेवकमंडळ, जांबावली, मराठागायकसमाज, ऋषिवन, भारतमित्रकार्यालय, विमलेश्वर.

**५ मुरगांवमहाल** पृष्ठ ४४ ते ४६ —मुरगांव, शंखावली, कुशस्थली, साहित्यसेवामंदिर.

**६ अंत्रुजमहाल** पृष्ठ ४७ ते ५९—शिरोडें, श्रीकामाक्षीमंदीर, शिक्षणप्रसारकसंस्था, बोरी, फोंडें, आलमेदकालें

महाराष्ट्रग्रंथसंग्रलय, श्रीकैवल्यपूर, श्रीशांदुर्गा, बांदिवडे ह्माडदोळ, प्रियोळविद्याभुवन, कुंडई, वेलिंग, मंगेशी, मन-मोहनकार्यालय, वेरें, मासेल, मडकई, शस्त्रकला.

**७ गोवाबेट** पृष्ठ ५९ ते ६८-कुंभारजुवें, शारदाविद्यालय, शिल्पकला, जुने गोवें, गोमांतकीय हिंदुसभा, हिंदुसभेची गोमांतकशाखा, रायबंदर, शिल्पकला, पणजी, महालक्ष्मीमंदीर, सरस्वती व महालक्ष्मीमंदीर, मुष्ठीफंड संस्था गोमांतकसाहित्यसेवकमंडळ, सच्चिदानंदमंडळ हिंदुफार्मसी, कालापूर, चिंबल.

**८ बारदेशमहाल** पृष्ठ ६९ ते ७४—ह्मापसें, सारस्वत विद्यालय, ज्ञानप्रसारकसंघ, कळंगूट, खोर्ली, श्रीलक्ष्मीनारायणमंदीर, श्रीमारुतीमंदीर, पिर्लेर्णे, सिवोली चिखली.

**९ भत्तग्राममहाल** पृष्ठ ७४ ते ७९—डिचोली, विद्यावर्धकसमाज, लामगांव, कारापूर, पांडुरंगमंदीर, नारवें, कासारपाल, शिरगांव, सांखळी, श्रीदत्तमंदीर, सन्मित्रसमाज श्रीमुर्लीधरविद्यालय.

**१० सत्तर महाल** पृष्ठ ७९ ते ८०—आंबेडें.

**११ पेडणें महाल** पृष्ट ८० ते ८४—आरोषा, मोरजी, मांद्रें, हरमल, केरी, पेडणे, श्रीरवळनाथ मंदीर, शीलोन्नतीसमाज, सीतारामविद्यालय, बालोन्नतीसमाज, धारगळ.

---

**सूचनाः**—पृष्ठ ५९ वरील **गोवाबेट** हा ७ वा महाल आहे, त्याचेमागें ७ चा **आंकडा** पाहिजे.

# अर्पणपत्रिका.

ज्यांच्या चरणांशीं बसून मातृभाषेंतील
पहिलीं मूळाक्षरें मी ग्रहण केलीं, आणि
पुढेंहि वेळोवेळीं संस्कृत साहित्यांतील
मार्मिक प्रसंग ज्यांच्या पायांशीं
बसून समजून घेतले ते माझे पर-
मपूज्य गुरुवर्य—श्री. अनंत नारा-
यण पै वेर्णेकर यांस हें
साहित्यपुष्प विनम्र भावानें
अर्पण करीत आहें.



व्यंकटेश विष्णु वैद्य.

# भौगोलिक माहिती.

या प्रांताच्या पूर्वेस बेळगांव जिल्हा, पश्चिमेस हिंदी महासागर, दक्षिणेस कारवार जिल्हा, उत्तरेस सावंतवाडी संस्थान आहे.

याचें क्षेत्रफळ १२१३ चौरस मैल असून लोकवस्ती ५॥ लाख आहे. सावंतवाडी संस्थानच्या हद्दीपासून कारवार जिल्ह्याच्या सीमेपर्यंत गोव्याची लांबी ६३ मैल आहे व मुरगांव पासून ब्रिटीश हद्दींतील पहिलें स्टेशन क्यासलरॉक पर्यंत रुंदी ५४ मैल आहे.

राजधानीचें गांव पणजी किंवा नवा गोवा हें असून म्हापसें, मडगांव हीं दोन गांवें त्याचे खालोखाल आहेत. मोठमोठ्या गांवीं पोष्ट व तारऑफीसही आहे. गोव्याचे **गोवेर्नादोर** हे पणजीस राहतात.

गोव्यांत दरसाल ९० इंच पर्यंत पाऊस पडतो. उष्णतामान २७ डिग्रीपर्यंत असतें. एकंदर गांवें ४०७ आहेत, हिंदूंची लोकसंख्या २२१०८३ असून ख्रिस्ती २४७५१८, मुसलमान ४९६१, इतर २०० व धर्मरहित ७५ आहेत. हवा फार उत्तम असून कांहीं ठिकाणें तर महेबळेश्वराच्या हवेसारखीं प्रसिद्ध आहेत.

एकंदर महाल किंवा तालुके ११ असून त्यांतील मुख्य गांव, संस्था, देवालयें वगैरेची माहिती या पुस्तकावरून वाचकांस कळेलच.

॥ श्रीशं वन्दे. ॥



# गोमांतक वर्णन.

## देश परिचय.

गोमांतक हा महाराष्ट्राचा दक्षिणसीमांत प्रांत आहे. पश्चिमेस विस्तृत आणि अथांग सागर आणि पूर्वेस सुंदर व निसर्गरमणीय सह्याद्रि, ह्याच्या सांनिध्यामुळें तो प्रांत नैसर्गिक-रीत्या परम रमणीय वाटत असतो. उत्तरेस काश्मीर, पश्चि-मेस गोमांतक, पूर्वेस आसाम आणि दक्षिणेस मलबार हीं चार भारतवर्षांतील नैसर्गिक नंदनवनें आहेत. ज्या प्रमाणें नगाधिराज हिमालयानें परिवेष्टित झालेला काश्मीरप्रांत आपल्या हिममय पर्वतराजीनें व देवदार वृक्षांच्या गर्द छायेनें अत्यंत रमणीय दिसतो, त्याचप्रमाणें गोमांतकप्रांतहि नारळीच्या बागांनीं व पोफळीच्या आगरांनीं शोभायमान दिसतो. सस्यश्यामल क्षेत्रांनीं परिवेष्टित असलेल्या पोफळीच्या किंवा नारळीच्या बागा नैसर्गिक शोभेंत देवदार वृक्षाच्या किंवा तालवृक्षाच्या उपवनांना खचित हार जाणार नाहींत. पोफळीच्या आगरांतील गर्द छाया देवदारवृक्षाच्या उपवना-

इतकीच गर्द असते आणि तितकीच हरितश्यामल पर्णांनींहि शोभायमान दिसत असते. निसर्गाच्या ह्या वरदहस्तामुळें मानवी सौंदर्यांतहि हा प्रांत अग्रगण्य आहे. काश्मिरी कंचनीप्रमाणें गोमांतकीय कलावंतिणीहि देहसौंदर्यांत प्रख्यात आहेत.

दुसऱ्याहि अनेक गोष्टींत **काश्मिर** आणि **गोमांतक** यांत साम्य आहे. काश्मिर हा भारतवर्षाचा उत्तरसीमांत प्रांत असल्यानें त्या बाजूनें भारतवर्षावर आक्रमण करणाऱ्या मुसलमानांच्या आक्रमणास प्रबल परिश्रमानें त्या प्रांताला तोंडास तोंड द्यावें लागलें आणि भारताचें उत्तरद्वार रक्षण करण्याकरितां अमित कष्ठ सहन केल्यामुळें गलित धैर्य होऊन मुसलमानी धर्मास आपल्या पोटांत वाव करून द्यावा लागला. म्हणून आजची बहुसंख्य काश्मिरी प्रजा मुसलमान धर्मीय आहे. त्याचप्रमाणें धर्मवेड्या युरोपियन लोकांच्या आक्रमणास सर्वांआधीं पश्चिमेकडून गोमांतकासच तोंड द्यावें लागल्यानें त्याला पाश्चात्य लोकांच्या व रोमन कॅथोलिक धर्माच्या आधिन व्हावें लागलें आणि आज गोमांतकांत त्यांचेंच वर्चस्व आहे. अज्ञ रूढि आणि कोत्या समजुती या योगानें हिंदु समाज ग्रस्त होऊन गेल्यामुळें हिंदु लोकांतील स्वातंत्र्यभावना व आक्रमक शक्ति पार लोपून गेली आहे आणि ह्मणूनच ज्या ज्या ठिकाणीं इस्लाम किंवा ख्रिस्ती या धर्मांशीं त्याला प्रतिस्पर्धा करावी लागते त्या त्या ठिकाणी त्याला आपलें वर्चस्व किंवा तुल्यबलत्वहि कायम ठेवतां येत नाहीं. गोमांतकांतहि तीच स्थिति दिसून येते. चारशें

वर्षांच्या अखंड पारतंत्र्यामुळें आणि राजकीय भिन्नत्वामुळें गोमांतकीय हिंदु लोक आपल्या अन्य प्रांतीय हिंदु बांधवांपेक्षां अगदीं हतबल झाले होते. त्यांना स्वसंस्कृतीची जाणीव नव्हती किंवा स्वदेशाची ओळख नव्हती. स्व आणि स्वजन ह्या पलीकडे त्यांची दृष्टी पोंचत नसे. गोमांतकांत जी अभिनव जागृति आज दिसत आहे, ती केवळ गेल्या पंचवीस वर्षांतील आहे. मग त्या जागृतीचें मुख्य कारण पोर्तुगालांत प्रजासत्ताक राज्यपद्धति स्थापन झाली हें असो किंवा रूसो—जपानी युद्धामुळें संपूर्ण आशियाटिक लोकांत एकप्रकारें नवजीवन मिळालें हें असो; परंतु आजला टीचभर गोमांतक आपल्या येवढ्या लोकवस्तीच्या भारतवर्षांतील कोणत्याहि प्रांताला हार जाणार नाहीं. **धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक, वाङ्मयिक,** आणि **राजकीय** या सर्वांहि क्षेत्रांत गोमांतकीयांनीं गेल्या पंचवीस वर्षांत अश्रुतपूर्व प्रगति केली आहे. यंदा त्या प्रांतांत **महाराष्ट्रसाहित्य-परिषद्** भरणार आहे आणि **सारस्वत ज्ञातीच्या** या माहेरघरीं महाराष्ट्रांतील सरस्वति पुत्रांचें संमेलन घडून येणार आहे. प्रस्तुतकालीं महाराष्ट्रीय साहित्यसेवकांना गोमांतकाचा संपूर्ण परिचय नाहीं. कारण तशी विश्वसनीय माहितीच मुळीं उपलब्ध नाहीं, म्हणून या वर्णनद्वारें गोमांतकाचा परिचय इतर महाराष्ट्रीय विद्वानांना करून देण्याचें आम्हीं योजिलें आहे. परिचय करून द्यावयाचा तो यथाक्रम व सुसंगत रीतीनें करून देणें अत्यावश्यक असल्यानें इतर महाराष्ट्रीयांस जास्त अपरिचित असलेल्या दक्षिणेच्या

बाजूनें परिचय करून देत देत उत्तरेच्या टोंकापर्यंत बहुतेक सर्व महत्वाच्या स्थानांचा त्यांस परिचय करून द्यावा असा विचार आहे कारण आजवर जे बहुतेक महाराष्ट्रीय विद्वान आमच्या प्रांतांत आले, त्यांच्या अवलोकनांत **मडगांव, पणजी** वगैरे शहरेंच आल्यामुळें तेथील लोकांशिवाय अन्य प्रांतांतील लोकांशी त्यांचा परिचय घडला नाहीं. यामुळें त्यांना मिळालेली माहिती अगदीं अपुरी आहे. गोमांतकीयानींहि जी माहिती आपल्या महाराष्ट्रीय बंधूंस कित्येक नियतकालिकांतून दिली गेली आहे तीहि यथाक्रम नसून लेखकांस जी जी माहिती जास्त परिचित होती ती ती दिली गेली आहे म्हणून, आज संगतवार माहिती देण्याचें आम्हीं योजिलें आहे.

---

# काणकोण महाल.

काणकोण महाल हा गोमांतकांतील सर्वांत मागसलेला महाल असून तो गोमांतकाच्या दक्षिण सीमेवर आहे. काणकोण या शब्दाची व्युत्पत्ति कानकोन या शब्दांवरून झाली असून त्यांचा अर्थ कर्नाटकाचा कोंपरा असा आहे. कान ह्मणजे कर्ण व कोन ह्मणजे कोंपरा. चालीरीति, पोशाक, रूढि, वजनें, मापें व भाषेची ढब यांवरून हा महाल पूर्वी कर्नाटकांत समाविष्ट होता याविषयीं संशय राहत नाहीं. तेथील चालीरीति महाराष्ट्र संस्कृतिपेक्षां कर्नाटक संस्कृतीलाच जास्त जवळच्या आहेत; शिवाजी आणि ज्ञानेश्वर या महान पुरुषांच्या कर्तबगारीमुळें मूळचे कर्नाटकाचे जे कित्येक प्रांत महाराष्ट्रांत समाविष्ट झाले त्यांतच या महा-

त्याची गणना करण्यास हरकत नाहीं. या महालांत गेल्या कांहीं वर्षांपूर्वीं कानडी लिपींत व कोंकणी भाषेंत सर्व व्यावहारिक लिखाण चालत असे; पण आतां ती जागा मराठी भाषेनें व देवनागरी लिपीनें व्यापिली आहे. अजूनही काणकोणचे लोक करमलघाट ओलांडून जावयाचें झाल्यास आपण गोव्यांत जातों असेंच ह्मणतात. जणूं काय काणकोणचा गोव्यांत अंतर्भाव होतच नाहीं अशीच त्या वेळीं त्यांची भावना असते. परंपरागत समजुतीचा मनावर झालेला हा संस्कार आहे.

हा महाल १७६४ सालीं सौंधेकर राजाकडून तहाप्रमाणें पोर्तुगीजांस मिळाला. ह्याचें क्षेत्रफळ १०३ चौरस मैल असून लोकसंख्या अवघी २०८२५ आहे. बहुतेक भूमि अरण्यांनीं व्यापलेली असून महाल डोंगराळ असल्यानें जमीन नापीक आहे. येथील लोकांची गरीबीबद्दल सर्व गोमांतकांत प्रख्याति आहे. सारस्वतांतील वैष्णव सांप्रदायी आचार्यांचा मठ ह्या प्रांतांतच असल्यानें ह्या प्रांतांत पूर्वी धर्मशास्त्रपारंगत लोकांचा मोठा भरणा होता. परंतु हल्लीं लोकाश्रयाच्या अभावीं संस्कृत विद्येचा सगळीकडेच लोप झाला असल्यानें ह्या महालांतहि विद्वान शास्त्र्यांची परंपरा आतां दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. सरस्वतीच्या आराधनेऐवजीं आतां त्यांची प्रवृत्ति देमांदेश्वराची आराधना करण्याकडेच जास्त दिसून येते.

## लोलयें.

हा काणकोण महालांतील सर्वांत दक्षिणेकडचा गांव असून तो त्या महालांतील सर्वांत महत्वाचा गांव आहे.

लोल म्हणजे सुंदर आणि यें म्हणजे स्थान. नांवाप्रमाणें खरोखरच हें अत्यंत सुंदर स्थान आहे. ह्या गांवची एकंदर लोकसंख्या पांच हजारांवर असून त्यांत ब्राम्हणाची लोकसंख्या सात आठशें आहे. सारस्वत ब्राम्हणाची जास्त वस्ती असलेले हाताच्या बोटावर मोजण्याइतके जे गोमांतकांत गांव आहेत, त्यांतच ह्या गांवचाहि अंतर्भाव होतो. ह्या गांवाच्या मध्यभागीं डोंगर असून चारहि बाजूंनीं सागर आणि सरिता यांनीं तो वेष्टिलेला असल्यानें गांवांतील कोणत्याहि ठिकाणीं उभें राहिलें असतां निसर्गाचें अत्यंत मनोरम दृश्य दिसून येतें. नारळी पोफळीच्या उपवनानी व सस्यश्यामल क्षेत्रांनीं हा गांव परिपूर्ण आहे. वसंतऋतूंत पोफळींना बहर येत असल्यानें त्यांच्या मादक सुवासानें रसिकांचें अंतःकरण परमोल्हादीत होऊन जातें.

## केशवाचें देवालय.



हें देवालय लोलयें गांवच्या मध्यभागीं आहे. देवालयाची बांधणी सुंदर असून दोन्ही बाजूंस भव्य अग्रशाला आहेत. मंदिराची बांधणी कर्नाटकी पद्धतीची असून त्यांत कोठें कोठें महाराष्ट्रीय पद्धतीचें मिश्रण दिसून येतें. देवालय स्थापनेस अतिशय रम्य असें निसर्गसुंदर स्थान निवडण्यांत स्थापकानें अत्यंत बुद्धिमत्ता दाखविली असल्यानें त्याचें कौतुक केल्याशिवाय राहवत नाहीं. अंतःकरणांत भक्तीचा

ओलावा नसलेल्या मनुष्याचेंहि मन त्या ठिकाणीं कांहींवेळ रममाण झाल्याशिवाय राहत नाहीं. नवरात्र आणि फाल्गुनोत्सव हे येथील मुख्य उत्सव आहेत. इतरहि उत्सव चांगल्याप्रकारें होत असतात. देवालयाला उत्पन्नहि चांगलें आहे. गोमांतकांतील इतर कांहीं सारस्वतांच्या देवालयांप्रमाणें येथील पूजारी द्रविडब्राम्हण नसून सारस्वतब्राम्हणच आहेत.

## निराकाराचें देवालय.

हें देवालय लोलयें गांवच्या उत्तर टोंकास आहे. देवालयांत मूर्ति नाहीं म्हणूनच या देवालयाला निराकाराचें आकार नसलेल्या देवाचें—देऊळ असें संबोधण्यांत येतें. मूर्ति नसलेलें गोमांतकांत हें एकच देवालय आहे. देवालयाची जागा समुद्रकिनाऱ्यावर असून अत्यंत रम्य दिसते. गोमांतकांतून कर्नाटकांत जाणाऱ्या मुख्य रस्त्यावरच हें देवालय आहे. त्रिपुरी पौर्णिमा व चैत्र पौर्णिमा हे येथील मुख्य उत्सव होत. खाडीवर बंधारा घालून त्या भूमिवर हें देवालय बांधलेलें असल्यानें ह्याला बेटाचें स्वरूप आलें आहे. देवालयाची बांधणी सुंदर असून ती कर्नाटकी पद्धतीची आहे. ह्या देवालयाचें गर्भागार, चौक व सभामंडप चांगला विस्तृत असल्यानें गांवांतील सार्वजनिक कार्यास हेंच देवालय जास्त पसंत केलें जातें.

## मुष्टिफंड संस्था.

गेल्या तीन वर्षांमागें मराठी शिक्षणाचा प्रसार करण्याकरितां या गांवांत एक संस्था स्थापन झाली असून श्रीपर्तगाळ मठाधीश तिला चांगलें सहाय्य करीत असतात.

येथील कळकळीचे लोकसेवक व विद्वान श्री. व्यंकटेश गोविंद प्रभुशास्त्री हे या संस्थेचे अध्यक्ष आहेत. आणि त्यांच्याच निरलस प्रयत्नामुळें व स्वार्थत्यागानें ही मुष्टिफंडावर चालत असलेली संस्था चांगल्या जोमदार रीतीनें चालली आहे. या संस्थेच्या विद्यमानें गांवांत चार शाळा चालत असून त्यांत दोनशें मुलें मोफत शिक्षण घेत असतात. अजूनपर्यंत संस्थेचा सर्व खर्च गांवांतील लोकांनींच चालविला असून संस्थेंत सर्व स्पृश्य जातीच्या लोकांना समभावानें वागविण्यांत येतें. खरा कळकळीचा एकटाच कार्यकर्ता अगदीं अशिक्षित गांवांतसुद्धां संस्था स्थापन करून ती किती कुशलतेनें चालवूं शकतो ह्याचें ही संस्था मूर्तिमंत उदाहरण आहे.

## पैंगीण.





पैंगीमुनीच्या आश्रमावरून या गांवाला पैंगीण असें नांव पडलें अशी आख्यायिका आहे; पण आम्हांला तें खरें वाटत नाहीं. सह्याद्रिखंडांत वर्णन केलेल्या पुंगिनी नदीस पैंगीणच्या उत्तरेस असलेल्या नदीचें वर्णन बहुतांशीं लागू पडतें आणि त्या नदीवरूनच ह्या गांवाला पैंगीण असें नांव पडलें आहे असें वाटतें. ह्या गांवची वस्ती तीन हजारांवर आहे. गांव चांगला शोभिवंत असून नारळी पोफळीच्या उपवनांनीं

गजबजलेला आहे. या गांवांत गायक समाजाची जास्त वस्ती असून ब्राह्मणापेक्षांही त्यांनीं शैक्षणिक व आर्थिक बाबतींत जास्त उन्नति करून घेतली आहे. गायकबंधूंनीं चालविलेली येथें एक शिक्षणसंस्था आहे; पण ती आतां योग्य तितक्या जोमानें चालत नाहीं. **नारायणाचें व परशुरामाचें** अशीं दोन देवळें येथें मुख्य असून त्यांची बांधणी साधारण प्रतीचीच आहे.

## पर्तगाळ.



श्रीकमलानाथतीर्थ.

श्रीमाधवेंद्राकांततीर्थ.

हा पैंगीण गांवचाच एक भाग आहे. पर्तगाळ या शब्दाचा मूळ शब्द पर्वत गाळ असा असून त्या शब्दाचा अर्थ दोन पर्वतांमध्यें असलेली सुपीक भूमि असा आहे. श्री वैष्णव स्वामीचा मठ पुंगिनी नदीच्या कांठींच एका डोंगराच्या उतरणीवर आहे. मठास निवडलेलें स्थान नैसर्गिकरीत्या चांगलें सुंदर असून गेल्या वर्षींच पन्नास हजार रुपये संस्थानच्या तिजोरींतून खर्चून श्रीमदिंदिराकान्ततीर्थश्रीपादांनीं मठाची दुरुस्ती केली असल्यानें नैसर्गिक सौंदर्यांत जास्तच भर पडली आहे. बहुतेक सर्व हिंदूंचे उत्सव येथें होत असतात; पण मठांतील मुख्य मूर्ति श्रीरामाची असल्यानें श्रीरामनवमीचा उत्सव येथें फार मोठ्या प्रमाणावर होतो. उत्सवांत पंधरा दिवसपर्यंत ब्राह्मण संतर्पण होतें. त्यांतील कांहीं दिवस सर्व गोरगरिबांस अन्नदान करण्यांत येतें. सध्यां विद्यमान असलेले उभय आचार्य (श्रीमदिंदिराकान्त तीर्थ व श्रीकमलानाथतीर्थ) सुविद्य, बहुश्रुत, धर्मनिरत व शास्त्रपारंगत आहेत. कोणत्याही अतिथीचें या मठांत चांगल्य प्रकारें स्वागत होतें. मठांतील सेवकवर्ग गुणी व कामांत दक्ष असा आहे. मडगांवहून थेट मठापर्यंत मोटार जाते.

## काणकोण.

हा गांव महालाचें मुख्य ठिकाण आहे. राज्यकारभाराच्या सर्व कचेऱ्या येथेंच असल्यानें ह्या गांवाला महत्व आलें आहे. गांव समुद्रकिनाऱ्यावर असून वस्ती चार हजार आहे. सरस्वतीमंदीर नांवाची एक संस्था कांहीं वर्षांमागें येथें स्थापन झालेली असून श्री. पुंडलिक दत्तात्रय गायतोंडे हे तिचे

प्रमुख कार्यकर्ते आहेत. संस्थेतर्फे एक विद्यालय व एक वाचनालय चालू आहे. विद्यालयांतील शिक्षक गांवचेच असून अत्यंत स्वार्थत्यागपूर्वक व कळकळीनें काम चालवितात. गांवच्या वेशीस मल्लिकार्जुनाचें देवालय असून त्या देवालयाला वीस हजार रुपये उत्पन्न आहे. पण त्या मानानें देवालयाची सुस्थिति व सुव्यवस्था दिसत नाहीं. देऊळ जुनें झालें असून आसपासची प्रभावळ व अग्रशालाही चांगल्या स्थितींत नाहीं. देवालय भव्य असून स्थानही रम्य व शोभिवंत आहे. पूर्वी येथें ब्राह्मणास महाजनाचे हक्क नव्हते, गेल्या कांहीं वर्षांमागेंच त्यांना ते अधिकार मिळाले आहेत. ह्मणून पूर्वीची स्थिति आतां सुधारेल असें वाटतें. प्रसिद्ध बारा ज्योतिर्लिंगांपैकीं मल्लिकार्जुन तो हाच असें येथील लोक सांगतात. हें देवस्थान बरेंच जागृत आहे. या गांवांतील तरुणवर्गानें गेल्या दहावीस वर्षांत पाश्चात्य विद्येंत चांगली प्रगति केली असून नोकरशाहींत आपलें बस्तान चांगलें बसविलें आहे.

## तर्पण.

गयाक्षेत्रांत असलेल्या फल्गु नदीप्रमाणेंच पुंगिनी नदीचें महात्म्य वर्णन करून तिच्यांत पिंडदान केलें असतां पितरांस मोक्ष मिळतो असें सह्याद्रिखंडांत लिहिलें आहे. म्हणून पूर्वकालीं याच ठिकाणीं पितरांस तर्पण करीत असत असें या नांवावरून कळून येतें. अतिपरिचयादवज्ञा झाल्यामुळें गोमांतकीय लोक आतां या ठिकाणीं तर्पण करीत नाहींत. क्षेत्रस्थान जितकें दूर असतें तितकी त्यावर लोकांची श्रद्धाहि

जास्त असते. तसेंच या स्थानाचेंहि झालें आहे. येथें पुंगिनी-नदीचें पात्र बरेंच रुंद असून तिची शोभाहि किनाऱ्या-वरील देखाव्यानें अतिशय आल्हादकारक दिसते. फल्गु नदीप्रमाणें ही नदीहि येथें वालुकामय आहे.

## खोलगड.

प्रसिद्ध सौंधानरेश रामराजेंद्र वडियार यानें हा विलक्षण मजबूत किल्ला बांधून त्याला आपलें नांव दिलें होतें, पण त्याच्या अतिशय उंचीमुळें वरून पाहिल्यास समुद्र अत्यंत खोल दिसतो यावरून पुढें त्यास खोलगड असें नांव पडलें. फक्त ज्या भूशिरावर हा दुर्ग बांधिला आहे तें भूशिर मात्र आतां रामाचें भुशीर या नांवानें ओळखलें जातें. सदाशिव राजेंद्र वडियार यांनीं बांधलेला सदाशिवगड व रामराजेंद्र वडियार यांनीं बांधलेला रामगड हे दोन समुद्र किनाऱ्या-वरील दुर्ग त्या वेळच्या सौंधा संस्थानांत महत्वाचे होते. याच गडावरून तोफांचा प्रबळ मारा झाल्यामुळें **श्रीसंभाजी महाराजांस** अंजनिद्वीपावरील मोहीम टाकून आल्या पावलीं परत जावें लागलें. श्रीशिवाजी महाराजांनीं पश्चिम समुद्रावर बांधलेल्या सिंधुदुर्ग आणि विजयदुर्ग ह्या दुर्गांपेक्षाहि हा रामदुर्ग जास्त मजबूत व मोऱ्याच्या ठिकाणीं आहे. गडावर जाण्यास फक्त एकच वाट असून ती तुटलेल्या कडयावरून असल्यानें नेभळट मनुष्यास सहसा आंत जातां येत नाहीं. अतिशय उंचीमुळें गडाच्या टोंकावरून समुद्राकडे पाहि-ल्यास सामान्य मनुष्यास घेरीच येते. दुर्गाच्या तटाची भिंत पांच हात रुंद असून आंत सैनिकांस राहण्याकरितां विस्तृत

पटांगण आहे. समुद्राच्या बाजूनें गड निमुळता बांधलेला आहे. दुर्गांतील पटांगणांत पांच गंजलेल्या तोफा समुद्राकडे तोंड करून टांकलेल्या दिसून येतात. तींतील सर्वांत मोठी तोफ तीन फूट व्यासाची आहे. गेल्या पन्नास वर्षांमागें पोर्तुगीज सरकारच्या सैन्याची एक तुकडी तेथें निरंतर तळ देऊन होती. पण आधुनिक युद्धकलेंत गडाचें व दुर्गाचें महत्वच नष्ट झाल्यामुळें ती छावणी सरकारनें काढून घेतली. किल्यावर दारुगोळयाकरितां भूमीच्या गर्भांत एक भव्य कोठार बांधलेलें आहे. हें भुयार आहे असें तेथील लोक सांगतात पण बारकाईनें पाहिलें असतां त्याची असत्यता प्रचितीस येते.

---

## २—चंद्रवाडी व बाळ्ळी महाल.

पोर्तुगीज अमदानीपूर्वी हे दोन महाल विभक्त होते. पण पोर्तुगीज सरकारनें हे दोन्ही महाल एकत्र करून त्यास केपें महाल असें नामाभिधान दिलें. सन १७६३ त हा मुलूख सोंधेकर राजाकडून पोर्तुगीजांच्या ताब्यांत आला. ह्या महालाची लोकसंख्या आतां २१३८६ असून त्यांत अधिक लोक हिंदूच आहेत.

### करमल घाट.

गोवा प्रांत नैसर्गिकरीत्या सुंदर आहेच, पण विशेषतः त्यांतील कांहीं स्थळें अशीं आहेत कीं, त्यांना निसर्गाचीं क्रीडामंदिरें असें नामाभिधान दिल्यास मुळींच अतिशयोक्ति होणार नाहीं. साष्टी महालांतून काणकोण महालांत जातांना लागणारा करमल घाट हेंहि गोमांतकांतील एक प्रेक्षणीय

स्थान आहे. हा घाट समुद्रसपाटीपासून सुमारें एक हजार फूट उंचीवर असून तेथून तीन मैलांवर असलेला समुद्राचा देखावा ह्या ठिकाणाहून अतिशय उत्तम दिसतो. जांब, साग, किनळ वगैरे वन्य वृक्षांच्या घनदाट छायेनें व हरितपर्णांनीं या स्थळाला अत्यंत शोभा आलेली आहे. कित्येक ठिकाणीं झुळझुळ वाहणारे निर्झर आपल्या कलकलरवानें पांथस्थांचे कर्ण व मधुर जलानें तृषितांची तृष्णा हरण करून सकल जीवसृष्टीला आनंद देण्यांत गढून गेलेले दिसून येतात. सुप्रसिद्ध साधुवर्य नाईकस्वामी हे ह्या नैसर्गिक सौंदर्यानें मुग्ध होऊन कित्येक वर्षें या जंगलांत राहिले होते.

## फातर्फें.

फातर्फें हा गांव बाळ्ळी महालांतील एक सुंदर स्थान आहे. " फातर्फेंहून गोंय लागीं " ही कोंकणी भाषेंतील सुप्रसिद्ध म्हण ह्याच गांवावरून पडली. श्रीशांतादुर्गादेवीचें देवालय ही ह्या गांवांतील एक प्रेक्षणीय जागा आहे. ही देवी मुळची साष्टी महालांतील कुकळ्ळी या गांवची. अजूनहि तिच्या नांवापुढें कुकळ्ळीकरीण हें उपपद लावण्यांत येतें आणि बहुतेक सर्व उत्सव कुकळ्ळींतील लोक आपसांत वर्गणी काढून करीत असतात. पोर्तुगीज धर्मवेडयांनीं जेव्हां साष्टीमहालांत बाटाबाटीचा धुमाकूळ माजविला, तेव्हां सन १५६५ सालीं कुकळ्ळीकरांनीं डोंगराच्या पलीकडे असलेल्या फातर्फें गांवात देवीचें स्थलांतर केलें. रंगपंचमीच्या दिवशीं अजूनही कुंकळी गांवांत तिची पालखी येत असते. पौष शु. ५ पासून पांच दिवसपर्यंत येथें जत्रा भरते.

## शारदासेवकमंडळ.

ही संस्था कित्येक वर्षांपासून येथें चालू आहे व तिचें कार्य समाधानकारक आहे. श्री. त्रिविक्रमशास्त्री सहकारी हें ह्या संस्थेचे केवळ प्राण होत. येथें सारस्वत ब्राह्मणाची फारशी वस्ती नसल्यानें संस्थेचीं सर्व सूत्रें द्रविड ब्राह्मणाच्याच हातीं आहेत. संकुचित वृत्ति व आपल्या पुरतें पाहणें हा फार मोठा दोष आहे आणि तो येथेंहि ठळकपणें दिसून येतो; परंतु द्राविडांत स्वार्थत्यागवृत्ति, चिकाटी व आत्माभिमान हे गूण जास्त प्रमाणांवर असल्यानें ही संस्था आजपर्यंत चांगल्यारीतीनें चालली आहे. वेदविद्या व धर्म-शास्त्र ह्यांचेंहि शिक्षण या संस्थेमार्फत मोफत देण्यांत येतें. संस्थेच्या मालकीची एक लहानशी इमारत असून त्या मंदि-रांतच वाचनालय व पाठशाळा चालू आहे. येथील देवीच्या तलावाचें पाणी रोगजंतुनाशक व आरोग्यकारक असल्यानें पुष्कळ रोगी फातर्फे येथें येऊन बरे होऊन जातात. पण अज्ञानरोगाचा नाश करणारी ही संस्था त्याहिपेक्षां जास्त प्रशंसनीय आहे.

## होर्ण.

पणजी येथील कामत ह्या प्रसिद्ध घराण्याची कुलदेवी महामाया ह्या देवीचें देवालय या गांवांत आहे. देवालय

जरी छोटें असलें तरी अत्यंत नयनमनोहर आहे. या देवालयाचा सभामंडप तर विशेष प्रेक्षणीय आहे. वर्षांतून दोन तीन उत्सव चांगल्यारीतीनें साजरे केले जातात. हें देवालय एका डोंगराच्या उतरणीवर वसलेलें आहे. तेथून खालीं वाहणाऱ्या गिरिनदीचा व नारळीच्या बागांचा देखावा सुंदर दिसतो.

## बाळ्ळी.



बलिपत्तन नावानें या जागीं पूर्वी एक मोठें शहर होतें. पण आतां त्याचा मागमूसहि तेथें कांहीं दिसत नाहीं. ह्यावरून कालाचा तडाखा किती जोर असतो हें कळून येतें. येथें एका लहानशा टेंकडीवर एक मेठेकोट आहे परंतु तो अगदीं आधुनिक म्हणजे पोर्तुगीजकालीन आहे हें त्याच्या बांधणीवरून कळून येतें. येथील वैष्णवस्वामीचा मठ भव्य व विस्तृत असून आसपासच्या सारस्वत ब्राम्हणांचें पौरोहित्य ह्या मठाधिकाऱ्यांकडे आहे. सांप्रतचे मठाधिकारी सौजन्ययुक्त व उदार असून ते अतिथीस मुक्तहस्तानें अन्नदान करीत असतात. ह्या मठांत **व्यंकटेशाची** मूर्ति असून श्रीअनंत चतुर्दशीचा उत्सव चांगला होतो.

## अडणें.

कलाकौशल्य हा गोमांतकाचा आत्मा आहे. प्रख्यात शिल्पकार, मान्य चित्रकार आणि प्रसिद्ध कवि ह्यांविषयीं

गोमांतकाची प्राचीनकालापासून प्रसिद्धी आहे आणि प्रस्तुतही गोमांतकांत पुष्कळ कलावान मनुष्यें विद्यमान आहेत. आकुंचित क्षेत्रामुळें जरी या प्रांतांत कलेला फारसा आश्रय नसला आणि अकुशल राज्यकर्त्यांमुळें कलेची वाढ करण्याची इथें जरी सोय नसली, तरीहि आपल्या उपजत बुद्धिचातुर्यामुळें कित्येक गोमांतकीयांनीं सबंध भारतवर्षांत आपलें सन्मानाचें स्थान कायम ठेविलें आहे. गोमांतकांतील कलावंतिणी सौंदर्यांतच प्रसिद्ध आहेत असें नाहीं तर गानकुशलतेंतही त्यांनीं आपलें श्रेष्ठ स्थान कायम ठेवलें आहे व नृत्यकलेंतही त्यांनीं चांगलें प्राविण्य पटकावलें आहे. ज्या अंगविक्षेपांनीं मनुष्य आश्चर्यचकित होऊन जाईल असले अंगविक्षेप करण्यांत या प्रांतांतील वारवनितांना फारसे प्रयास पडत नाहींत. नक्षिकाम, बुरुडकाम, पोतकाम, मूर्तिकला, रंगकला इत्यादि अनेक कलेंत गोमांतकीयांचें पाऊल बरेंच पुढें आहे. अडणें हा गांव कांकणें बनविण्याच्या कलेविषयीं पूर्वीं प्रसिद्ध होता. अनेक प्रकारचीं देशी कांकणे बनविण्यांत येथील कारागीर पटाईत होते; परंतु पाश्चात्य देशांत बनविलेलीं सुंदर कंकणे गोमांतकाच्या बाजारांत स्वस्त भावानें मिळूं लागल्यानें आतां तो धंदा साफ बसला आहे. पाश्चात्यांनीं हिंदी लोकांचें स्वातंत्र्यच हरण केलें असें नाहीं, तर त्यांची कलाही साफ बुडवून टाकली.

## केपें.

केपे महालाची ही राजधानी असल्यानें येथें बऱ्याच सरकारी कचेऱ्या दिसून येतात. गोमांतकांतील प्रसिद्ध

"भारत" पत्र येथेंच निघतें आणि त्यावरूनच केप्यांची जास्त प्रसिद्धि आहे. गोमांतकांतील प्रसिद्ध व पवित्र नदी जी कुशावति तिच्या उभय तीरांवर हा गांव वसलेला आहे. पूर्वी या गांवाला कुशबन असें नांव होतें; पण आतां केपें हेंच नांव ह्या गांवाला रूढ झालें आहे. ह्या गांवानजीक कुशावतीला धरण बांधून पोर्तुगीज सरकारनें कालव्याच्या मार्गानें तें पाणी दूरवरपर्यंत पोंचविलें आहे. गोमांतकांतील हाच कालवा मुख्य होय. त्याशिवाय ह्या गांवांत कुशावतीवर बांधलेला पूल अतिशय प्रेक्षणीय आहे. त्यावर उभें राहिलें असतां निसर्गाचा देखावा अनुपम दिसून येतो.

## भारत कार्यालय.

भारत कार्यालय हाच केप्यांचा खरा अलंकार आहे. ह्या पत्राचे संपादक श्री० हेगडे देसाई हे कळकळीचे देशभक्त असून तनमनधनानें झटून देशसेवा करीत असतात. ह्यांच्याइतका स्वार्थत्यागी, निस्पृह, विद्वान व न्यायपरायण देशभक्त गोमांतकांतच काय पण भारतवर्षांतही विरळाच. अनीतीचा व ढोंगी देशभक्तीचा ह्यांना अत्यंत तिटकारा असल्यानें फंडगुंडाशीं व नांवाला हपापलेल्या नामधारी देशभक्तांशीं ह्यांचें मुळींच जुळत नाहीं. गोमांतकाच्या आकुंचित क्षेत्रामुळें त्यांच्या कार्यक्षेत्रास फारसा वाव नसल्यानें भारतवर्षांत त्यांचा फारसा बोलबाला नाहीं परंतु भारतमातेचे ते एक सच्चे सुपुत्र आहेत यांत तिळप्राय संशय नाहीं. आजपर्यंत त्यांच्यावर एकंदर वीस खटले झाले आहेत आणि देशकार्याकरितां जीवन अर्पण केल्यामुळें त्यांना आर्थिक

बाबतींत असहनीय कष्ट सहन करावे लागले आहेत. नोकरशाहींत घुसलेल्या स्वजनानी त्यांना दिलेल्या अमीत त्रासाकडे पाहिलें म्हणजे ऊर फाटून जातो. साधेपणांत व सौजन्यांत तें कोणालाही हार जाणार नाहींत.

## बालोन्नति समाज.

श्री० हेगडे देसाई हेच ह्या संस्थेचे आधार आहेत. भारत कार्यालयांत येणारीं सर्व पत्रें व पुस्तकें ते ह्याच संस्थेला अर्पण करितात व आज कित्येक वर्षेपर्यंत संस्थेच्या विद्यमानें चालणारें वाचनालय व विद्यालय त्यांच्याच जागेंत बिनभाड्यानें आहे. ह्या संस्थेनें लोकशिक्षणाचें कार्य कित्येक वर्षेपर्यंत अबाधित रीतीनें चालविलें आहे. गांवांत बहुतेक नोकरपेशा लोकांची वस्ती असल्यानें त्यांच्याकडून स्वार्थत्यागाची अपेक्षा करणें हें मुसळाला अंकुर फुटण्याइतकें अशक्य आहे, हें ह्या संस्थेचे चालक समजून आहेत, तरीही चालकांनीं अत्यंत परिश्रमानीं नाट्यप्रयोगादि रूपानें चांगला फंड जमविला असून त्या द्रव्याच्या व्याजानें शाळा चालवून विद्याभुवन बांधण्याच्या विचारांत चालक वर्ग आहे.

## चंद्रेश्वर.



हा पर्वत अत्यंत नयनमनोहर असून सुमारें बाराशें फूट उंचीवर आहे. या पर्वताच्या मस्तकावर सुंदर शिवालय

असल्यानें मूळ ह्या पर्वताला चंद्रमौलीश्वर हें नांव होतें असें वाटतें. ह्या पर्वताविषयीं व देवाविषयीं पुष्कळ आख्यायिका व दंतकथा प्रचलित आहेत व त्यांतील बहुतेकांचा संग्रह प्रसिद्ध व विद्वान गोमांतकीय कविवर्य श्री. विष्णु रंगाजी शेळडेकर यांनीं आपल्या चंद्रेश्वरमहात्म्य या कविताबद्ध पुस्तकांत केला आहे. परंतु आम्हाला त्या दृष्टीनें गोमांतकाचा परिचय करून द्यावयाचा नसल्यानें तें महात्म्य मुळांतच वाचण्याची आम्हीं वाचकांना सूचना करितों. नैसर्गिकरीत्या व हवेच्या दृष्टीनें हें स्थान अत्यंत सुंदर व आरोग्यावह असून महाबळेश्वर किंवा माथेरान ह्यांपेक्षांहि चांगलें आहे. शिखरावरून जो नयनमनोहर देखावा दृष्टीस पडतो त्याचें वर्णनहि करण लेखकाच्या आवाक्या बाहेरचें आहे. प्रत्येक सहृदय मनुष्यानें एक वेळ तरी चंद्रेश्वराच्या शिखरावर आरोहण करावें, अशी आमची आग्रहाची शिफारस आहे. पर्वताच्या मस्तकावर असंख्य जलनिर्झर असून त्यांचें जल अत्यंत मधुर, पाचक व आरोग्यावह आहे. पर्वतावर वारांगनाची बरीच वस्ती आहे. सारंगीच्या कर्णमधुर आवाजानें व रमणिकंठांतून निघालेल्या सुस्वर तानांनीं तेथें जाणाऱ्या रसिकांचें अंतःकरण आनंदानें समूल्हासित झाल्याशिवाय राहत नाहीं. चैत्र शु॥ पौर्णिमेस येथें जत्रा भरत असते व त्यावेळीं भव्य रथाची मिरवणूक काढण्यांत येते. येथें श्री. बाजीगुरव हे बीन वाद्य वाजविण्यांत पठाईत आहेत.

## काकोडें

हा गांव केपें महालांत सर्वांत सुपीक असून ह्या गांवांत सुमारें पांच हजार वस्ती आहे. मध्यभागीं महादेवाचें देवालय

आहे. येथे गोमांतकांतील बहुतेक सर्व उत्सव साजरे केले जातात. देवापुढें पाणी नाच पाडण्याची गोमांतकांतील पद्धति मोडून भजनी दिंडीने पालखी नेण्याचा या गांवांतील लोकांनीं पाडलेला प्रघात अत्यंत अभिनंदनीय आहे. गांवांत गायक समाजाची बरीच वस्ती असून त्यांनीं शिक्षणांत चांगली प्रगति केली आहे. ह्या गांवांतील ब्राम्हणांनींहि एक शिक्षणसंस्था चालविली असून विद्यालयाकरितां "सरस्वति विद्याभुवन" नांवाचें मंदिर बांधण्याचा उपक्रम चालविला आहे.

## सांवर्डें.

सांवर्डें या नांवानें ओळखलें जाणारें गोमांतकांतील हें प्रसिद्ध स्टेशन केंपें महालांतील कुडचडें गांवांत आहे. सावर्डें हा गांव नदीपलीकडे असून तो सांगें महालांत आहे पण नजरचुकीनें असो किंवा बुद्धिपुरःसर असो कुडचड्याला सावर्डें हें नांव एकदां रूढ झालें तें झालें; परंतु वज्रलेप झालेला वंगभंग जर दूर होऊं शकतो तर ही चूकही दुरुस्त करणे सरकारास अशक्य नाहीं. आगगाडीमुळें आतां या गांवास शहराचें रूप आलें आहे. पणजीहून गोमांतकाच्या मध्यभागीं नेणाऱ्या वाफोराचें हेंच शेवटचें स्टेशन असल्यानें त्या दृष्टीनेंहि हें दळणवळणाचें केंद्र झालें आहे. गांवांत तांदूळ सडण्याच्या व तेल गाळण्याच्या दोन तीन गिरण्या आहेत. टाटा कंपनीनें चालविलेल्या लोखंड गाळण्याच्या कारखान्याचें मुख्य ऑफिसहि पूर्वी येथेंच होतें पण धंद्यांत नुकसान येऊं लागल्यानें त्या कंपनीनें आपलें कार्य आतां संपुष्टांत आणूं घातलें आहे.

6304

## ३—साष्टी महाल.

साष्टी महाल हाच गोमांतकांत सर्वांत पुढारलेला महाल आहे. सासष्ट गांवच्या समूहावरून या महालाला साष्टी असें नांव पडलें. गोमांतक वसविणाऱ्या सारस्वत ब्राह्मणांनीं प्रथम ह्याच महालांतील मडगांव, शंखावली, कुशस्थळी, लोटावली, वरेण्य, राय, कुडस्थळी आणि नागवें ह्या गावांत वस्ती केली आणि तेथून त्यांचा वंश वाढत वाढत सर्व भारतवर्षांत पसरला ह्या महालांतील मुख्य शहर जें मडगांव त्याला पोर्तुगीज ग्रंथकारांनीं कोकणांतील अथेन्स अशी संज्ञा तेथील लोकांच्या बुद्धिमत्तेवरून दिली होती. प्रस्तुतकालींहि 'गोमांतकाचें पुणें' ह्या संज्ञेनें हें शहर ओळखण्यांत येतें. सांप्रत या महालांत एक दशांश लोकसंख्या म्हणजे सुमारें अकरा हजार लोक हिंदु आहेत परंतु ते बहुतेक सर्व सुशिक्षित, घरंदाज व खाऊन पिऊन सुखी असल्यानें गोमांतकांतील इतर महालांतील हिंदूंत त्यांनीं श्रेष्ठ स्थान संपादन केलें आहे. पोर्तुगीजांनीं गोवाबेट जिंकून घेतल्यावर लवकरच हाहि प्रांत त्यांच्या आहारीं गेला. आणि गोवा बेटापेक्षांहि ह्या महालासच बाटाबाटीचा आणि पोर्तुगीजांच्या जुलुमाचा जास्त त्रास सहन करावा लागला. पोर्तुगीज सरदार दियोग रुद्रीगीश यानें एकाच दिवसांत या महालांतील साडेतीनशें देवालयें बाटविलीं होतीं. आतां ठिकठिकाणीं पसरलेल्या सारस्वत ब्राह्मणांच्या सर्व कुलदेवांचीं देवालयें पूर्वीं ह्याच प्रांतांत होतीं.

## कुंकळी.

कुंकळी हाच गांव ह्या महालांतील सर्वांत दक्षिणेकडचा आहे. गांवची एकंदर लोकवस्ती दहा हजार असून त्यांत फक्त एक पंचमांश लोक हिंदु आहेत. कुंक--अवळी या शब्दावरून ह्या गांवाचें नांव साधलें असून त्या शब्दाचा अर्थ कुंकाचें स्थान असा आहे. कुंक या नांवाच्या एका अस्पृश्य घराण्याचा अंमल ह्या गांवावर पूर्वी होता. त्या घराण्याला डांगी--ह्मणजे जमिनीचा वसूल करणारे अधिकारी--अशीहि संज्ञा होती. त्याच्या प्राचीन वाड्याचे अवशेष आजहि तेथें दिसून येतात व त्या घराण्यासंबंधीं पुष्कळ दंतकथा अजूनहि आबालवृद्धांच्या तोंडीं आहेत. ह्मैसुराकडून आलेल्या मराठ्यांनीं ह्या घराण्याचा नायनाट करून या गांवावर आपली सत्ता स्थापन केली. ह्याच मराठ्यांनीं पुढें धर्मवेड्या पाद्र्यांची कत्तल करून ख्रिस्ती धर्मप्रसारास आळा घातला. गोमांतकांत सर्वांत जास्त ब्राह्मणवस्तीचा गांव ह्याच आहे परंतु त्यांनी अगदीं अलिकडे येऊन या गांवांत वस्ती केलेली आहे

## ज्ञानप्रसारकसमाज.

ज्ञानप्रसारक समाज हीच ह्या गांवांतील सर्वांत मोठी शिक्षणसंस्था आहे. ती सरकारांत रजिष्टर झालेली असून गोमांतकांत हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या ज्या उत्तम संस्था आहेत तींतच ह्या संस्थेची गणना होते. प्रो. शंभु विश्वंभर केंकरे व श्री. भगवंत विठ्ठल चिमुलकर यांच्या अविश्रांत खटपटीनें दोन वर्षांपूर्वीं या संस्थेची स्थापना

झाली. तिच्या विद्यमानें एक विद्यालय व एक वाचनालय चालू आहे. समाजाचें स्वतःच्या मालकीचें शालागृह नसल्यानें ती उणीव भरून काढण्याच्या विचारांत चालक मंडळी आहे. संस्थेतर्फे बहुतेक सर्व राष्ट्रीय उत्सव साजरे केले जातात.

## चित्रकला व शिल्पकला.

चित्रकला व शिल्पकला ह्याविषयीं कुकळ्ळी गांवची अत्यंत प्रसिद्धी आहे. सर्व गोमांतकांत रंगारी, शिल्पकार लोकांची वस्ती याच गांवांत असल्यानें गोव्याची सावंतवाडी या नांवाने हा गांव ओळखला जातो. सावंतवाडींत होणारें सर्व रंगीत सामान, तऱ्हेतऱ्हेचीं रंगित व हुबेहुब दिसणारीं फळें, पादुका इत्यादि हरएक रंगित वस्तु येथें अत्युत्तमरीतीनें करण्यांत येतात. मालाला मागणी फार असल्यानें प्रथम आर्डर दिल्याशिवाय कोणताहि रंगित मल येथें सहसा मिळत नाहीं. हेदीच्या लाकडाला रंग लवकर चढून खुलून दिसत असल्यानें बहुतेक रंगित वस्तु त्याच लाकडाच्या करण्यांत येतात व त्याला सुंदर लाखेचा रंग देण्यांत येतो. चितारी लोकांतील कांहीं लोक हस्तिदंत, पाषाण, संगमरवर व गंधाचें—चंदनाचे—लाकूड यांच्या देवाच्या मूर्ति व अन्य जिनसा करण्यांत अत्यंत पटाईत आहेत. हे लोक केवळ हस्तकौशल्यानें यंत्राहिपेक्षा नाजूक व सुरेख काम करतात. मूर्तींच्या चेहऱ्यावरील कोणताहि सूक्ष्म भाव दाखविण्यांत तर ह्यांचा अगदीं हातखंडा आहे. भारतीय शिल्पकला अजूनहि जशीच्या तशी कायम आहे ह्याचें प्रत्यंतर ह्या लोकांच्या

खोदकामांतील अपूर्व कौशल्यावरून चांगलें कळून येतें. परंतु दुःखाची गोष्ट हीच कीं, कामाच्या मानानें चांगलें शिल्पकाम केलेली वस्तु बरीच महाग विकावी लागत असल्यानें ह्या लोकांना पोर्तुगालांतून येणाऱ्या युरोपियन कामदारांचाच बहुधा आश्रय असतो.

## वास्तुकला.

टेबलें, खुर्च्या, कपाटें, आलमारी, बंदुका वगैरे करणारे वास्तुकलाभिज्ञ कारागिरहि या गांवांत पुष्कळ आहेत. परदेशाच्या तोडीची किंबहुना त्याहून कांकणभर सरस अशीच यांची वास्तुकला असते; पण काम जितकें सरस तितकें तें महाग असल्यानें युरोपियनांतच त्या कामाचा खप असतो. येथील कारागीर उत्तम फ्रेंच बंदुकीच्या तोडीच्या बंदुकी करीत असतात आणि गोमांतकांत हत्यारांचा कायदा नसल्यानें त्यांचा खपहि चांगला असतो. मोटारच्या बॉडी बांधण्याचे कित्येक कारखानें या गांवांत आहेत. पुस्तकें कापण्याचीं लहान मशिनें व बंदुकीचीं काडतुसें करण्याचीं मशिनेंहि येथील कारागिर लोक करीत असतात.

## असोळणें.

हा गांव साल नदीच्या तीरावर वसलेला आहे. गांव अत्यंत सुपीक असून एकंदर वस्ती पांच हजार आहे. हिंदूंची वस्ती फक्त एक दशांश आहे परंतु येथील बहुतेक लोक संपन्न व सुशिक्षित असल्यानें **श्रीवेताळप्रासादिक ज्ञानमंदिर** या नांवाची एक उत्तम शिक्षणसंस्था येथील

लोकांनीं चालविली आहे. संस्था स्थापन झाल्यास आज तेरा वर्षें होऊन गेलीं. या संस्थेचें कार्य इतक्या दीर्घकालावधिपर्यंत समाधानकारक रीतीनें चाललें आहे. प्रो. बाबूराव शंकर कामत ह्या विद्वान गृहस्थांच्या परिश्रमानें ह्या गांवांत सर्व शैक्षणिक कार्य पार पडत असतें.

गोमांतक हा कलाप्रधान प्रांत आहे. उपजतबुद्धीचे कलावान पंडित या प्रांतांत गांवोगांवीं दिसून येतात. आसोळणें येथील प्रख्यात चित्रकार श्री. रामकृष्ण अनंत गिंडे हे एक ह्या प्रांतांतील झांकलें माणिक आहेत. राजा रविवर्म्याप्रमाणें ह्यानींहि कोणत्याहि चित्रविद्यालयांत शिक्षण संपादन न करितां चित्रकलेंत चांगलें प्राविण्य मिळविलें आहे. यांनीं निर्माण केलेलीं अनेक चित्रें पाहून प्रेक्षक आनंदानें मुग्ध होऊन जातो. चित्रकाराप्रमाणेंच हे उत्तम मूर्तिकार, अभिनय निपुण नट, रसिक कवि आणि श्रेष्ठ वादक आहेत. सारांश मयसंहितेंत सांगितलेले स्थपतीच्या अंगीं असणारे सर्व गुण त्यांच्या अंगीं संपूर्णत्वानें वास करीत आहेत. " जरि उकिरड्यांत पडला मळला न हिरा तथापि सामान्य " या मयुरोक्तिप्रमाणें ते जरी एका खेडेगांवांत वास करीत आहेत तरी त्यांच्या असामान्य गुणाची प्रभा आसपास बरीच फैलावलेली आहे.

## वास्तुशास्त्र.

येथें आरशावर चित्रें काढणें, कंदील बनाविणें, जस्ताचीं निरनिराळ्या प्रकारचीं भांडीं करणें, शिवणकला इत्यादि

वास्तुशास्त्रांत प्राविण्य मिळविलेले अनेक कारागिर आहेत. परदेशांतून येणाऱ्या या प्रकारच्या बहुतेक सर्व वस्तु ते उत्तम रीतीनें येथें तयार करितात. येथील कारागिरांचीं हस्तकौल्याचीं कार्यें पाहून पुष्कळ युरोपियन तज्ञ आश्चर्यचकित होऊन गेले आहेत. निरनिराळ्या प्रकारचीं तैलचित्रें, मिश्रणयुक्त रंग, व्हार्निशें, वगैरे करण्यांत येथील लोकांची प्रसिद्धि आहे. चांगला राजाश्रय मिळाल्यास प्राचीन भारतीय कला ऊर्जितावस्थेस येण्यास विलंब लागणार नाहीं. हें येथील कारागिरांनीं बनविलेलीं उत्तम कामें अवलोकन केलीं असतां तत्काळ कळून येतें.

## मडगांव.

हेंच शहर सासष्टी महालाची प्राचीन कालापासून राजधानी आहे. गोमांतक वसविणाऱ्या व तेथें प्रथम राज्य करणाऱ्या ब्राम्हणांची हीच राजधानी होती. त्यावेळीं येथें गौडपादाचार्यांचा भव्य मठ असल्यानें या गांवाला मठग्राम असें नांव पडलें. मडगांव हा त्याच नांवाचा अपभ्रंश आहे. पुढें बहुसंख्य सारस्वतब्राम्हणानीं वैष्णव मताचा स्वीकार केल्यानें या मठाला फारसें महत्व राहिलें नाहीं आणि पुढें बाटाबाटीच्यावेळीं त्या मठाचें कैवल्यपुरास स्थलांतर झालें. येथील ग्रामदेव **दामोदर.** त्याच्या देवालयाचा अवशेष व तलाव शहराच्या उत्तरेस आहे. बाटाबाटीच्यावेळीं ह्या देवालयाचें सांगें महालांतील **जांबावलें** गांवांत स्थलांतर करण्यांत आलें. प्रस्तुत या शहरांत बारा

हजार लोकवस्ती असून त्यांतील एक चतुर्थांश हिंदु आहेत. इतक्या थोड्या लोकांनीं करून घेतलेली आपली प्रगति पाहून तेथील हिंदूंचें कौतुक वाटल्याशिवाय राहत नाहीं. ख्रिस्ती लोकांपैकीं बहुतेक वरीष्ठ वर्ग बाटलेल्या ब्राम्हणांचाच आहे. ते अजूनहि आपणास ब्राम्हण म्हणवून घेतात आणि खालच्या वर्णांशीं सहसा बेटीव्यवहार करीत नाहींत.

### मठग्रामस्थ हिंदुसभा.

ह्या सभेंत चारहि वर्णांच्या हिंदूंचा समान हक्कानें समावेश करण्यांत आला आहे. गोमांतकांतच नव्हे तर संबंध भारतवर्षांतहि असल्या प्रकारची सभा ह्या जात्याभिमानानें पछाडलेल्या कालांत विद्यमान नाहीं असें वाटतें. गोमांतकांत प्रमुख असलेल्या सारस्वत ब्राम्हणांचा दिलदारपणा व समाजहिताविषयींची कळकळ यावरून चांगली निदर्शनास येते. सर्वजातीय, राष्ट्रीय व धार्मिक उत्सव या संस्थेकडून पार पाडण्यांत येतातच; पण त्याहीपेक्षां पवित्र असें शिक्षणकार्य या संस्थेकडून जोमानें चालू आहे. संस्थेचे कार्यवाह श्री. आत्माराम शंभु पाणंदीकर हे निरलस अंत:करणाच्या तळमळीनें कार्य करणारे व परमतासहिष्णु असल्यानें संस्थेची एकसारखी भरभराट होत आहे. स्वार्थत्याग, सौजन्य आणि साधेपणा या गुणांच्या योगानें त्यांनीं संस्थेचा इतका उत्कर्ष घडवून आणलेला आहे.

## सारस्वत ब्राम्हण-समाज.

ही संस्था सतरा वर्षांपूर्वी कांहीं देशहितैषि तरुणानीं स्थापन केली होती. संपूर्ण गोमांतकांत आतां एवढा ग्रंथ-संग्रह कोठेंहि नाहीं. महाराष्ट्रांतील अनेक साहित्य-भक्त विद्वानांना आणवून त्यांच्याकडून गोमांतकीयांस ज्ञानदान करण्याचा परिपाठ या संस्थेनें ठेवलेला आहे. समाजाच्या मालकीचें एक सुंदर मंदिर शहरच्या केंद्रस्थानीं उभारण्यांत आलें आहे. अजून या मंदिराचा उद्‌घाटन समारंभ झालेला नाहीं; परंतु येत्या साहित्यपरिषदेच्या अध्यक्षांच्या हस्तें तो होईल असें म्हणतात. संस्थेचा एवढा उत्कर्ष होण्यास संस्थेचे एक स्थापक श्री. काशिनाथ दामोदर **नायक** हे बहुतांशीं कारणीभूत आहेत. त्यांची विद्वत्ता, व्यासंग, अनेक-भाषाकोविदत्व व व्यवहारचातुर्य यांचा लाभ संस्थेस मिळा-ल्यानें संस्थेचा अतोनात फायदा झालेला आहे.

## युवकसंघ.


भारत वर्षांत ठिकठिकाणीं स्थापन झालेल्या युवकसंघाच्या धर्तीवर देशाची सामाजिक व राजकीय उन्नति करण्या-करितां हा संघ स्थापन झाला आहे. आज भारतवर्षांत तारुण्याच्या धडाडीनेंच कार्य करण्याची आवश्यकता आहे यांत संशय नाहीं. कोणाच्याहि विरोधास व बाष्कळ टीका-पांस न जुमानतां अस्पृश्योद्धाराचें व शारीरिक उन्नति करून घेण्याचें कार्य युवकांनीं आपल्या शिरावर घेतलें आहे आणि तें कार्य पार पाडण्याकरितां संघांत सामील असलेले तरुण

अविश्रांत परिश्रम करीत आहेत. शारीरिक उन्नति घडवून आणण्याकरितां श्रीशिवाजी व्यायाममंदिर नांवाची एक व्यायामशाळा त्यांनीं स्थापन केली आहे. पुष्कळ तरुण या गृहांत रोज व्यायाम करीत असतात. संस्थेचे प्रमुख नेते श्री. नरसिंह पुरुषोत्तम सुकेकर हे धडाडीचे कार्यकर्ते आहेत. त्यांचा उत्साह, चिकाटी, सौजन्य व कार्यकुशलता इत्यादि सर्व गुण वाखाणण्यासारखे आहेत. असल्या कर्तबगार तरुणाच्या नेतृत्वाखालीं संस्थेची भरभराट होईल यांत संशय नाहीं.

## दैवज्ञब्राम्हण समाज.

दैवज्ञब्राम्हण समाजांतील प्रगतिप्रिय तरुणानीं ही संस्था चालविली आहे. या ज्ञातींतील प्रसिद्ध श्रीमान गृहस्थ श्री. कृष्ण शंकर वेर्लेकर यांची ह्या संस्थेला पूर्ण सहानुभूति असल्यानें ह्या संस्थेचें कार्य समाधानकारक रीतीनें चालू आहे. गोमांतकांतील दैवज्ञसमाज सुवर्णालंकार घडविण्यांत अत्यंत कुशल आहे. सुवर्णाचें कसलेंहि नाजूक व सूक्ष्म कार्य करण्यांत या ज्ञातींतील लोकांच्या परंपरागत सरावामुळें अगदीं हातखंडा आहे. वरील संस्थेच्या द्वारें शिक्षणांतही या समाजानें चांगली प्रगति केली आहे. यांच्या शिल्पकौशल्यामुळें आफ्रिकेंतील पोर्तुगीज वसाहती व मुंबई शहर येथेंही या लोकांचा चांगला जम बसला आहे. कार्यकुशलतेंत भारतवर्षांतील कोणत्याही प्रांतांतील लोक या लोकांचा हात धरूं शकणार नाहींत. सुवर्णालंकार घडविण्याची कला या शहरांत शिखरास पोंहोचली आहे.

## श्रीविठ्ठल मंदीर.



प्रजासत्ताक राज्याच्या स्थापनेनंतर सबंध साष्टी महालांत बांधलेलें हेंच पहिलें देवालय आहे. मडगांवच्या वैश्यसमाजानें आपसांत वर्गणी काढून हें सुंदर व भव्य देवालय हिंदु वस्तीच्या मध्यभागीं बांधलेलें आहे. येथें बहुतेक सर्व धार्मिक उत्सव साजरे केले जातात. ब्राह्मणसमाजानेंहि या देवालयांत कित्येक उत्सव ठेवले आहेत. यावरून सारस्वत ब्राह्मणाची सर्वसंग्राहक बुद्धि चांगली दिसून येते.

## श्रीदामोदर विद्याभुवन.

मडगांवच्या ब्राह्मणसमाजानें बांधलेलें हें भव्य विद्याभुवन पाहिलें म्हणजे गोमांतकांतील हिंदूंची सार्वजनिक कर्तबगारी चांगली दिसून येते. ह्या भुवनाच्या बांधणीवरून पूर्वीं येथें कोणत्या तरी देवतेची स्थापना करण्याचा विचार होता असें वाटतें. कारण आंत उत्तम प्रकारचें गर्भागार तयार केलेलें असून चौकाच्या ठिकाणीं नाटकगृहाचीं योजना केलेली आहे. खरें पाहिलें असतां गोमांतकांत

असलेल्या असंख्य देवालयांत आणखी एका देवालयाची भर घालण्यापेक्षां चालत्याबोलत्या देवांना सुशिक्षित करण्याकरितां ह्या भुवनाचा उपयोग होत आहे हें अत्यंत स्तुत्य होय. इतकी भव्य सार्वजनिक इमारत व नाट्यभुवन सबंध गोमांतकांत दुसरें नाहीं.

## हिंदुकार्यालय.

शुद्ध भाषा मुद्देसुद कोटिक्रम आणि तर्कशुद्ध विचारसरणी या गुणानें प्रसिद्ध असलेलें **हिंदुपत्र** हें मडगांवचें एक भूषण आहे. गेलीं पांच सहा वर्षे गोमांतकाचें सार्वजनिक कार्य बजावण्यांत या पत्रानें तत्परतेनें भाग घेतला आहे. हिंदूचे संपादक श्री. दत्तात्रय व्यंकटेश पै हे श्रेष्ठ, विद्वान, ओजस्वी वक्ते, उत्तम लेखक आणि कार्यकुशल मुत्सद्दि ह्मणून प्रसिद्ध आहेत. अगदीं तरुणपणींच देशकार्यास जीवन वाहण्याचा त्यांनीं निश्चय करून तो आजपर्यंत चांगल्या रीतीनें पाळलेला आहे.

## सरस्वतिसेवकमंडळ.



ह्या संस्थेतर्फे दामोदर विद्याभुवनांत एक चांगलें वाचनालय चालू आहे. वार्षिक सरस्वत्युत्सवहि या संस्थेच्या विद्यमानें उत्तम रीतीनें पार पाडण्यांत येतो. ह्या उत्सवांत महाराष्ट्रांतील प्रसिद्ध विद्वानांचीं व्याख्यानेंहि होत असतात.

या संस्थेचे प्रसिद्ध कार्यकर्ते श्री. दत्तात्रेय पांडुरंग दलाल व श्री. यशवंत विष्णु रायतूरकर यांच्या नेतृत्वाखालीं ही संस्था चांगल्या रीतीनें चालू आहे. वाचनमंदिरांत पुस्तकसंग्रहहि बराच मोठा आहे.

## ओस्पीस.

ही संस्था मडगावांतील ख्रिस्ती लोकांच्या ताब्यांत आहे. या संस्थेच्या चार पांच भव्य व सुंदर इमारती असून त्यांत रुग्णालय, वेड्यांचें ऑस्पिटल, अनाथालय वगैरे उपयुक्त कार्यें चालू आहेत परंतु संस्थेच्या धोरणाप्रमाणें ह्यांतील एकाचाहि फायदा हिंदू लोकांना मिळत नाहीं. लॉटरीच्या तिकिटांच्या रूपानें लाखो रुपयांचा वार्षिक फायदा संस्थेस होत असतो. ह्यांतीत बहुतेक तिकिटें ब्रिटिश हिंदुस्थानांतच खपत असल्यानें हा सर्व पैसा हिंदु लोकांकडूनच संस्थेस मिळतो असें ह्मणण्यास हरकत नाहीं. नशिबाची परिक्षा पाहण्याचा हव्यास जोंपर्यंत हिंदु लोकांत कायम आहे तोंपर्यंत ह्या तिकिटांवर बहिष्कार पडणें शक्य नाहीं. गोमांतकांतलि श्री. पुंडलीक अनंत केणी, श्री. महादेव पुरुषोत्तम काकुळे, श्री. यशवंत विष्णु नायक इत्यादि वजनदार गृहस्थांनीं याच धर्तीची नूतन संस्था स्थापन केली तर हिंदु लोकांचें अतिशय हित होण्यासारखें आहे.

## बाणावली.

हा गांव मडगांवच्या सीमेवर आहे. गांवची एकंदर लोकवस्ती अकरा हजार असून $\frac{1}{10}$ लोक हिंदु आहेत पण येथील हिंदु लोकांची संघटित शक्ति वाखाणण्यासारखी

आहे. संघटनेच्या बलावरच या गांवांत त्यांनी आपलें सन्मानाचें स्थान कायम ठेविलें आहे. परशुरामानें बाणाच्या तेजानें समुद्र सुकवून कोंकणची भूमि निर्माण केली तेव्हां बाणाचें टोंक या गांवीं पडलें व त्यावरूनच यास बाणावली म्हणतात अशी दंतकथा या गांवाविषयीं प्रचलित आहे. परंतु ही पौराणिक दंतकथा सोडून दिल्यास बंधावली या शब्दाचा अपभ्रंश होऊन बाणावली हें नांव उत्पन्न झालें असें वाटतें. येथें नारळीच्या झाडांची लागवड केलेले बांध अतोनात आहेत. त्यांची ओळ ती बंधावली.

## सत्योन्नति समाज.

ह्या नांवाची संस्था कांहीं वर्षांमागें येथील हिंदूंनी स्थापन केली असून श्री. शंभुराव केंकरे यांच्या नेतृत्वाखालीं तिचें कार्य समाधानकारक रीतीनें चालू आहे. समाजतर्फे एक चांगलें विद्यालय चालत असून गांवांत एक लक्ष्मीदेवीचें मंदिरहि उभारण्यांत आलें आहे. लग्न मुंजी वगैरे सर्व मंगल समारंभ ह्याच सार्वजनिक ठिकाणीं साजरे करण्यांत येतात.

## सूर्यसरोवर.

सरोवर, कमल आणि हंस ह्यांचें साहचर्य महाराष्ट्रीयांनीं फक्त प्राचीन संस्कृत काव्यांत वाचावें. महाराष्ट्रांत हा त्रिवेणी संगम मुळींच दिसून येत नाहीं. बहुतेक प्राचीन संस्कृत कवी काश्मीर प्रांताच्या आसपास राहत असल्यानें त्या निसर्गसुंदर सृष्टिसौंदर्याचें वर्णन त्यांनीं आपल्या काव्यांत केलें आहे आणि

आधुनिक कवि कमलाचें, सरोवराचें, आणि हंसाचें वर्णन करतांना केवळ त्यांच्या हातास हात लावून मोकळे होतात पण या गांवांत प्राचीन काव्यांत वर्णन केल्याप्रमाणें एक सुंदर सरोवर आहे. सूर्य सरोवर असें या पुष्करिणीस नांव आहे. हा तलाव बराच मोठा असून चारही बाजूनें बंधाऱ्यांनीं बांधलेला आहे. यांत उगवणारीं कमळें सुंदर, सुवासिक व भव्य असतात आणि त्यांचा रंग तांबडा असतो. या कमलांचा विशेष हा आहे कीं यांच्या गर्भांत मोत्यासारखे सुंदर दाणे सांपडतात. बदकें आणि हंस यांची या तलावांत निरंतर वसती असल्यानें प्राचीन संस्कृत कवितेचा व्यासंग केलेल्या रसिकाला कालिदासाची आटवण झाल्याशिवाय रहात नाहीं.

## वरेण्य.

मडगांवच्या उत्तरेस चार मैलांवर हा गांव आहे. येथें पूर्वीं महालसादेवीचें देवालय होतें. गांवच्या पूर्वेस टेंकडीच्या मस्तकावर अजूनहि त्या देवालयाचे अवशेष व तलाव दिसून येतात. तलावाच्या कांठीं आंबराई असल्यानें सध्यां हें ठिकाण अतिशय रम्य दिसतें. जवळच देवि प्रकट झाल्या नंतर गाई आणि गोपाल यांची तृषा हरण करण्याकरितां तिनें पदनुपुराघातानें निर्माण केलेला नूपुरांचा निर्झर आहे. तो मुखाशीं ओरीसारखा सुंदररीतीनें बांधलेला आहे. आम्र, फणस, काजू इत्यादि वृक्षांची आसपास रेलचेल असल्यानें आसमंतांतील प्रदेश सुंदर दिसतो. ज्याठिकाणीं पूर्वीं महालसादेवीचें देवालय होतें त्याठिकाणीं ख्रिस्ताचें क्रूसचिन्ह

उभारण्याचा ख्रिस्ती लोकांनीं पुष्कळ प्रयत्न करून पाहिला; पण त्या प्रयत्नास यश येत नाहीं असें म्हणतात. आणि तें खरेंहि असेल कारण तेथें एक मोडका क्रुसाचा पायथा आहे. भाविक ख्रिस्ती गावडे महालसेच्या नांवानें त्या जागेवर रविवारीं फुलें व दिवा ठेवतात. जुनें म्हाडदोळ या नांवानेंच ती जागा प्रसिद्ध आहे.

## राय.

मडगांवच्या पूर्वेस तीन मैलांवर हा गांव आहे. पूर्वी रै क्षेत्र म्हणून हें क्षेत्र गोमांतकांत प्रसिद्ध होतें व तेथें कामाक्षी देवीचें देवालय होतें. त्या देवालयाचे अवशेष व तलाव रायहून लोटलीस जाण्याच्या रस्त्यावर आजहि दिसून येतात. बाटाबाटीचेवेळीं नदीपलीकडे शिरोड्यास त्या देवीचें स्थलांतर करण्यांत आलें. दैवज्ञब्राम्हण समाज नांवांची एक शिक्षणसंस्था येथें कांहीं वर्षांमागें स्थापन झालेली असून श्री. श्रीधरशेट बांदोडकर यांच्या नेतृत्वाखालीं ती चांगल्या रीतीनें चालत आहे. मुंबई येथें निवास करणाऱ्या समाजांतील कांहीं शिक्षणाभिमानी गृहस्थांकडून या संस्थेस चांगली मदत होते.

## चिंचोणें.

हा गांव मडगांवच्या दक्षिणेस चार मैलांवर आहे. गांव चांगला सुपीक असून एकंदर वस्ती दहा हजार आहे. यांतील ३० लोक हिंदु आहेत. परंतु बहुतेक हिंदु सुशिक्षित, संपन्न आणि विद्याप्रिय असल्यानें येथें दोन वर्षांमागें स्थापन झालेली सरस्वती सेवक समाज ही संस्था समाधान-

कारक रीतीनें चालू आहे. संस्थेचे कार्यवाह श्री. नारायण कृष्ण कुंदे हे विद्वान गृहस्थ या संस्थेकरितां स्वार्थत्यागपूर्वक अत्यंत परिश्रम करीत असतात. या गावांत मिठागरें पुष्कळ आहेत. येथील मिठागरांचा मक्ता ब्रिटिश सरकारकडे होता त्या वेळीं त्या खात्यांत नोकरीस असलेले प्रसिद्ध संगीत नाटयाचार्य श्री. बळवंत पांडुरंग किर्लोस्कर हे या गांवीं कित्येक कालपर्यंत निवास करून होते. त्यांना शाकुंतलाचें भाषांतर करण्याची स्फूर्ति याच गांवांतील अप्रातिम सृष्टि-सौंदर्य पाहून झाली असें सांगतात.

## रायतुर.

मडगांवच्या पूर्वेस चार मैलांवर हा गांव आहे. रायतुरचा किल्ला हा सार्ष्टीतील महत्वाचा किल्ला होय. पोर्तुगीज आणि मराठे यांची हा किल्ला हस्तगत करण्याकरितां झालेलीं कित्येक युद्धें इतिहासांत प्रसिद्ध आहेत. प्रस्तुत हा किल्ला पडक्या स्थितींत असून त्याचा विस्तृत असा जलविहिन खंदक प्रेक्षकांच्या नजरेस पडतो, तेव्हां “ सर्वे यस्य वशात गात् स्मृतिपथं कालाय तस्मै नमः ” असें त्यास वाटल्याशिवाय रहात नाहीं. येथें ख्रिस्तीधर्मशिक्षण देणारा ब्रह्मचर्याश्रम आहे. त्यांत साडेचारशें विद्यार्थी आहेत. आश्रमांतील शिस्त अत्यंत कडक असते. अध्यापक सौजन्ययुक्त व विद्वान असून अन्यधर्मीय जिज्ञासू प्रेक्षकास आश्रमांतील व्यवस्था चांगल्या रीतीनें दाखवितात. आश्रमाची इमारतहि चांगली भव्य, प्रशस्त, सुंदर असून तिला जोडूनच ख्रिस्ती देवालयही आहे. पोर्तुगीज सरकारकडून आश्रमाला पुष्कळ

मदत होते. आश्रमांतील शिक्षणक्रम पूर्ण केलेल्या स्नातकांना ख्रिस्ती समाजांत बराच मान आहे. धर्मोपदेशकाचा पेशा पत्करणाऱ्या स्नातकानें मात्र आजन्म ब्रह्मचर्यव्रत पालन केलें पाहिजे असा नियम आहे.

---

## ४–सांगे महाल.

अष्टाग्रहार व हेमाड हे पूर्वींचे दोन महाल एकत्र करून पोर्तुगीज अमदानींत हा महाल बनविलेला आहे. गोमांतकांतील सर्व महालांत हा महाल क्षेत्रफळानें मोठा आहे; पण मुलुख डोंगराळ व वस्ती अगदीं विरळ असल्यानें ह्या महालाला फारसें महत्व नाहीं. हा १७६३ सालीं सौंधेकर राजाकडून पोर्तुगीजांस मिळाला. सध्या ह्या महालाची लोकसंख्या २६११८ असून त्यांत बहुसंख्य लोक हिंदु आहेत.

### दुधसागर.

गोमांतकांतील हा प्रख्यात धबधबा रेल्वेनें गोमांतकांत शिरतांना सरहद्दीवरच प्रेक्षकाच्या नजरेस पडतो. उत्तुंग पर्वतावरून पडणाऱ्या प्रपाताच्या फेनधवल दुधासारख्या शुभ्रत्वावरून यास दुधसागर असें नांव पडलें. ह्या धबधब्याची खरी शोभा पहावयाची असेल तर दुधसागरच्या स्टेशनवर उतरून तेथें मुक्कामच करणें योग्य आहे. गाडींतून धबधब्याची शतांशही शोभा दृष्टीस पडत नाहीं. सर्व ऋतूंत विशेषतः पावसाळ्यांत ह्या धबधब्याची जी शोभा दिसते ती केवळ अवर्णनीय आहे. उंच कड्यावरून खालीं

उडी घेणारा हा शुभ्र प्रपात पाहून रसिकांचें अंतःकरण समुल्हासीत झाल्याशिवाय रहात नाहीं. जगांत प्रसिद्ध असलेला गेरसप्पाचा धबधबा आपल्या भव्यत्वानें प्रेक्षकांचें मन आकर्षून घेत असेल; परंतु सौंदर्यांत तरी हा धबधबा जगांतील कोणत्याही धबधब्यास हार जाणार नाहीं. ह्या धबधब्याच्या पाण्यावर वीज उत्पन्न करून ती वीज मुंबई आणि पुणें या शहरांस पुरवावी असा टाटा कंपनीचा कांहीं वर्षांमागें हेतु होता; पण पोर्तुगीज सरकारनें घातलेल्या अटी त्या कंपनीस पसंत न झाल्यानें तो संकल्प तसाच राहिला.

## कुळें.

रेल्वेंतून येणाऱ्या मालावर जकात घेण्याचें व प्रवाशांच्या आरोग्याची तपासणी करण्याचें हेंच ठिकाण आहे. गोमांतकाबाहेरील प्रवासी या जकात घेण्याच्या पद्धतीला व तपासणीला कंटाळून जातात व त्यांना नको हा गोमांतकाचा प्रवास असें होऊन जातें. प्लेग जंतुनाशक धूर देण्याची पद्धति तर त्यांना कशीशीच वाटते; पण आपल्या सत्तेखालीं असणाऱ्या प्रजेच्या आरोग्याची काळजी घेणें हें प्रत्येक सरकारचें कर्तव्य असल्यानें सुविचारी माणसास तरी त्यांत कांहीं गैर वाटण्याचें कारण नाहीं. असले कडक उपाय योजल्यामुळेंच कारवार, बेळगांव आणि वेंगुर्लें ह्या तीनही बाजूस हमेशा असलेला प्लेग गोमांतकांत शिरत नाहीं. प्लेगच्या भीतीनें वर्षांनुवर्ष गांवांबाहेर झोंपड्यांत राहून जीवन कंठण्यापेक्षां तपासणीचा व धुराचा थोडासा त्रास सोसणें किती तरी फायदेशीर आहे.

## सांगें-

येथें दोन नद्यांचा संगम झाला असल्यानें या गांवास पूर्वी संगम असें नांव होतें. सांगें हा त्याच नांवाचा अपभ्रंश आहे. पूर्वी हा गांव फार भरभराटींत होता कारण घाटावरून लमाणाच्या तांडयांनीं येणारा माल येथें उतरून होडीनें सर्व गोमांतकांत जात असे पण गोव्यांत आगगाडी झाल्यापासून या गांवाला उतरती कळा लागली.

### आर्यविज्ञान कार्यालय.

गोमांतकाचे एक विद्वान साहित्यसेवक व तज्ज्ञ ज्योतिषि जोतिर्भूषण नारायण अनंत नाईक पाटणकर यांच्या संपादकत्वाखालीं निघणारें 'आर्यविज्ञान' मासिक येथेंच त्यांच्या मालकीच्या संगमोदय छापखान्यांत निघतें. श्री. पाटणकर हे जाडे विज्ञान असून त्यांच्याकडे दुर्मिळ पुस्तकांचा संग्रहहि पुष्कळ आहे. मासिक व छापखाना त्यांनीं अगदीं झीज सोसून चालविला आहे. तरी गोमांतकाच्या विशिष्ट परिस्थितीमुळें त्यांचे प्रयत्न अजून यशस्वी झालेले नाहींत.

### श्रीविठ्ठलसेवकमंडळ.

ही संस्था येथें कांहीं वर्षांमागें स्थापन झालेली असून मुख्यत: वैश्य समाजानेंच ती चालविलेली आहे. ही संस्था शिक्षणदानाचें कार्य यथाशक्ति पार पाडीत आहे. संस्थेचे कार्यवाह श्री. अनंत बाबू गोवेंकर हे संस्थेची उन्नति करण्याकरितां झटत असतात. संस्थेमार्फत अनेक प्रकारचे उत्सवहि विठ्ठलमंदिरांत चालू असतात. ज्ञानदानाच्या

आधुनिक पद्धतीनें धार्मिक उत्सव साजरे करण्यांत संस्थेनें दाखविलेलें चातुर्य अत्यंत भूषणावह आहे.

## जांबावली.

श्रीदामोदराचें सुंदर व भव्य देवालय या गांवांत असल्यामुळें या गांवाला अपूर्व शोभा आली आहे. कुशावति नदीच्या पूर्वतीरावर वसलेला हा गांव नैसर्गिक सृष्टिसौंदर्यानें परिपूर्ण आहे. नदीचें पाणी स्वच्छ, पाचक आणि रोगजंतुनाशक असल्यानें कित्येक रोगी कुशावतीच्या घाटावर स्नान करून निरोगी होऊन जातात. नृसिंहवाडीच्या दत्ताप्रमाणें जांबावलीच्या दामोदराचीहि पिशाचबाधा नाशक म्हणून प्रसिद्धि आहे. भयंकर पिशाचबाधा झालेले रोगी येथें येऊन चांगले होऊन जातात. जांबावलीचा शिमगा गोमांतकांत प्रसिद्ध आहे. दामोदर हा मडगांवचा ग्रामदेव असल्यानें तो मठग्रामस्थ हिंदुसभेमार्फत करण्यांत येतो. ह्या सभेनें कांहीं वर्षांपासून या उत्सवांतील बीभत्स प्रकारांना फांटा दिला असून राष्ट्रीय झेंडा वंदन, राष्ट्रगीत गायन आणि बोधप्रद नाट्यप्रयोग ह्या तऱ्हेनें तो साजरा करण्यांत येतो. उत्सवांत आठ दिवसपर्यंत मुक्तद्वार अन्नदान करण्यांत येतें. विस्तृत व भव्य अग्रशाला आणि निरंतर जलपूर्ण असलेली विहीर देवालयानजीकच असल्यानें सर्व सुखसोयींनीं देवालय परिपूर्ण आहे. हिंदूंचे सर्व धार्मिक उत्सव येथें साजरे करण्यांत येतात.

## मराठा गायकसमाज.

गोमांतकांतील या समाजानें शिक्षणाच्या बाबतींत बरीच प्रगति केली आहे. या ज्ञातींतील कांहीं तरुण परदेशांत शिक्षणसंपादन करून आले असून आपल्या कर्तबगारीनें गोमांतकास भूषणभूत होत आहेत. महाराष्ट्रांतील सत्यशोधक नामधारी कंपूच्या गोटांत न शिरतां त्यांनीं स्वावलंबनानें व गोमांतकांतील अन्य सुशिक्षित वर्गाच्या सहकारित्वानें आपल्या ज्ञातींत जर शिक्षणप्रसार केला तर त्या समाजाची उन्नति होण्यास वेळ लागणार नाहीं. गायकसमाज हा पूर्वीपासून नृत्य, अभिनय व वादनकला प्रविण असल्यानें त्याहि कला ऊर्जितावस्थेस आणणें त्यांचें कर्तव्य आहे. त्या दृष्टीनें मनोहर स्त्री संगीत मंडळींत असलेली गायिका श्री. मैनावति जांबावलीकर ही गोमांतकाच्या कीर्तींत भर घालीत आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

## ऋषिवन.

अष्टाग्रहार प्रांतांतील हा मुख्य गांव आहे. गोमांतकावर प्राचीन कालीं राज्य करीत असलेल्या कदंब राजांनीं ह्या महालांतील आठहि गांव हविक ब्राम्हणांस अग्रहार करून दिले होते म्हणून या महालास अष्टाग्रहार अशी संज्ञा पडली. ह्या महालांत प्राचीनकालीं खोदलेले खोल कालवे आतां निर्जल स्थितींत दिसून येतात. यावरून पूर्वीं या प्रांतावर सत्ता गाजविणाऱ्या राजांनीं लोककल्याणाकरितां पुष्कळ कार्य केलें होतें हें कळून येतें. सर्व गोमांतकांत हाच भाग सृष्टिसौंदर्यानें जास्त नटलेला आहे. कर्दळीचीं बनें,

पोफळीचीं आगरें आणि नारळांच्या बागा ठिकठिकाणी दिसून येतात. ह्या भागांत पाण्याचीहि रेलचेल आहे परंतु कांहीं गांवांत मलेरियाचे जंतु असल्यानें या महालाचें उत्पन्न व लोकसंख्या दिवसेंदिवस कमी होत चालली आहे.

## भारतमित्र कार्यालय.

श्री० नारायण भास्कर नाईक यांच्या संपादकत्वाखालीं हें मासिक पांच सहा वर्षांपासून गोमांतकांत चालू आहे. प्रतिकुल परिस्थितीला तोंड देऊन रिवणसारख्या खेड्यांत मासिक चालू ठेवणें हें खरोखर अतिशय परिश्रमाचें आहे. पुढें मागें मासिकाची अंतर्बाह्य सुधारणा करण्यास अनुकूल परिस्थिति प्राप्त होईल या आशेवर संपादकांनीं मासिक कसेंबसें चालू ठेवलें आहे.

## विमलेश्वर

हें देवालय ऋषिवनाच्या मध्यभागीं असून तीन वर्षांपूर्वीं त्याचा जीर्णोद्धार केल्यामुळें आतां अतिशय नयनमनोहर दिसतें. प्राकार, अग्रशाला वगैरे सर्व सरंजाम यथास्थित आहे. देवालयाजवळच एक गुंफा आहे. त्या स्थलास पांडव. सडा असें म्हणतात. ही गुंफा म्हणजे एखादा बौद्धकालीन विहार असेल असा विद्वानांचा तर्क आहे. कांहीं अंतरावर वैष्णवस्वामीचा मठ असून तेथें एक दोन आचार्यांच्या समाधि आहेत. ऋषिवन हा गांव बहुतेक सर्व स्थलीं नैसर्गिक सौंदर्यानें परिपूर्ण असल्यानें परकीय प्रवाशांनीं एकवार पाहण्यासारखा आहे.

— —

# ५ मुरगांव महाल.

सासष्टी महालांत लोकसंख्या अतिशय जास्त असल्यानें राज्यकारभाराच्या सोयीकरता त्यांतील कांहीं मुलूख तोडून हा महाल सरकारनें निर्माण केला आहे. याची लोकसंख्या सुमारें तीस हजार असून वास्को ही राजधानी आहे. पाश्चात्य लोक अज्ञानामुळें पौर्वात्य देशांतील गांवाच्या नांवाचा किती विपर्यास करितात हें ह्या गांवावरून कळून येतें. मुरगांव हा शब्द कांहीं उच्चारावयास अवघड नव्हता; पण दीडशहाण्या पोर्तुगीजांनीं त्याचा मोर्मुगांव असा अपभ्रंश केला. इंग्रजांनीं तर त्यावरही ताण करून मार्मागोवा असें ऱ्या शब्दाला सोज्वळ रूप दिलें; परंतु इतक्यानेंही पोर्तुगीजांचें समाधान झालें नाहीं. युरोपियनास प्रथम भारतवर्ष ज्ञात करून देणारा पोर्तुगीज खलाशी व्हास्कु द गाम ह्याचें नांव ह्या शहरास त्यांनीं आतां दिलें आहे. रस्ते रुंद करून आणि शहरसुधारणा कायदा लागू करून हें शहर बनविण्याचा पोर्तुगीज सरकारचा आटोकाट प्रयत्न चालू आहे. परंतु राष्ट्राच्या व्यापाराचा व्याप वाढल्याशिवाय त्या राष्ट्रांतील शहरेंही ऊर्जितावस्थेस येत नसतात हें साधें तत्वही शहर वाढविण्याकरितां लाखों रुपये विनाकारण खर्च करणाऱ्या सरकारच्या लक्षांत येत नाहीं. कोणीकडून तरी लोकांच्या पैशावर आपल्या लांगूलचालकांच्या पोटाचा प्रश्न सोडविणें सरकारला आपलें कर्तव्य वाटतें.

## मुरगांव

मुरगांव हें बंदर सबंध भारत[illegible]ऱ्याचें व सोयीचें आहे असें ह्मणतात. कितीहि [illegible] आगबोट येथल्या बंदरांत नांगर टाकूं शकते. बंदराजवळच डोंगरावर मुरगांवचा किल्ला आहे. त्या किल्ल्यावरून पूर्वी पोर्तुगीज़ लोक शत्रूच्या आरमारावर मारा करून त्या आरमाराचा अचूक पाडाव करीत. आतां किल्ला अगदीं मोडकळीस आला आहे. बंदरापासून शहर १॥ मैल आहे. रस्ते अतिशय रुंद केल्यामुळें शहर हवाशीर दिसतें. ह्या शहराचा व्यापार हळू हळू वाढत आहे. येथें गोसेवक गो० वि० बरवे हे गोपाळ्ञ्नाचें कार्य चांगल्या प्रकारें करीत आहेत.

## शंखावली (साकवाळ)

पूर्वी येथें श्रीविजयदुर्गा व श्रीनरसिंह या देवतांचीं देवालयें होतीं तीं स्थानें अजूनही प्रवाशांच्या दृष्टीस पडतात. बाटाबाटीच्या वेळीं विजयदुर्गेचें वेर्यांच्या **केरीस** व नरसिंहाचें **वेलिंग** येथें स्थलांतर करण्यांत आलें. सुप्रसिद्ध त्रिखंडपंडित विद्वान व पाली भाषेचे प्रोफेसर धर्मानंद कोसंबी ह्यांचा जन्म ह्याच गांवीं झाला. ह्यानीं केवळ स्वावलंबनावर भारतवर्षांत ठिकठिकाणीं हिंडून अभ्यास केला आहे. गोमांतकाविषयीं त्यांना प्रखर अभिमान वाटतो. गोमांतकांत स्त्रीशिक्षणाचा प्रसार करण्याकरितां त्यांनीं आपली सर्व मिळकत दान केली होती; पण त्यांच्या अटी पूर्ण न झाल्यानें ती योजना तशीच राहिली.

## कुशस्थळी ( कुडाळ )

हा गांव अवनाशिनी नदीच्या दक्षिण तीरावर आहे. येथें पूर्वी मांगिरीशाचें देवालय होतें. आतां तें अंत्रूज महालांत मंगेशी येथें आहे. लोकसंख्येनें व कर्तबगारीनें सारस्वत ब्राह्मणांत याच देवाचे महाजन प्रमुख आहेत. कुडाळमध्यें मांगिरीशाचें देवालय ज्या जागीं होतें त्या जागेवर आतां ख्रिस्ती चर्च दिसून येतें. दक्षिण काशी म्हणून ज्या स्थलाची कीर्ति गाजत होती, त्या स्थळीं आतां बायबलांतील मंत्र-गान चाललेलें पाहून हिंदु लोकांच्या कमालीच्या दुर्बलते-बद्दल परमावधीचें दुःख झाल्याशिवाय रहात नाहीं.

### साहित्यसेवामंदीर,

ही संस्था कांहीं महिन्यापूर्वी मुरगांव येथें स्थापन झाली असून आजपर्यंत तिचें काम समाधानकारक रीतीनें चालू आहे. " सर्वारंभा स्तंडुला प्रस्थमूलः " ह्या न्यायानें असल्या संस्थांना द्रव्याची मदत फार मोठ्या प्रमाणावर होणें अत्यावश्यक आहे. मुरगांवसारख्या सार्वजनिक रहदारीच्या शहरांत या संस्थेला पैशांची वाण पडणार नाहीं असें वाटतें. चाळकांत परगांवाहून येऊन नोकरीच्या निमित्तानें वास करणाऱ्या लोकांचाच जास्त भरणा आहे. श्री. सावळाराम घनश्याम कंटक व प्रो. पंढरीनाथ हरि पाणंदीकर हे संस्थेचे कार्यवाह उत्साही व कर्तबगार आहेत.

# ६–अंत्रुज महाल.

हैदरअलीच्या स्वाऱ्यांस कंटाळून सोंधानरेश सदाशिव राजेंद्र वडियार यानें हा महाल पोर्तुगीजांच्या स्वाधीन केला. हा प्रांत सुपीक व सृष्टिसौंदर्यानें परिपूर्ण असून गोमांतकांतील बहुतेक महत्वाचीं व प्रेक्षणीय देवालयें याच भागांत असल्यानें ही भूमि अत्यंत पवित्र समजली जाते. प्रस्तुत या महालाची एकंदर लोकसंख्या ४५४५२ असून त्यांत बहुसंख्य लोक हिंदु आहेत.

## शिरोडें.

हाच गांव अंत्रूज महालांत सर्वांत महत्वाचा आहे. शिरोवाटिका–मुख्य उपवन -या शब्दाचा शिरोडें हा अपभ्रंश आहे. खरोखर अंत्रुज महालांतील एकेक गांव म्हणजे एक एक उपवन आहे यांत तिलप्राय: संशय नाहीं. नारळीच्या बागा, पोफळीचीं आगरें व कर्दलीचीं उपवनें ह्यांनीं प्रत्येक गांव भरगच्च भरलेला असतो. संपूर्ण गोमांतकांत शिरोडें येथील ग्रामसंस्था श्रीमान आहे. गांव अतिशय विस्तृत असून मध्यभागीं ग्रामदेव श्रीशिवनाथ याचें सुंदर व शोभिवंत देवालय आहे. हिंदूंचे बहुतेक उत्सव येथें होत असतात.

## श्रीकामाक्षी मंदीर.

श्रीशिवनाथाच्या देवालयाच्या पूर्वेस श्रीकामाक्षीचें देवालय आहे. देवालय भव्य व नयनमनोहर आहे. ह्या देवालयावर सोन्याचा कळस बसविलेला असून त्यावर सूर्यकिरण पडतांच अप्रत्तिम शोभा दिसून येते. देवालयाचा

सभामंडपहि विस्तृत व सुरेख आहे. देवालयाच्या पुढें दहावीस हातांवर सुदृढ रीतीनें व नयनमनोहर तऱ्हेनें बांधलेली पुष्करणी दिसून येते. या स्थलांत गायकसमाजाची पुष्कळ वस्ती असून कलावंत ह्मणून त्या लोकांची संबंध गोमांतकांत कीर्ति आहे. नामांकित चित्रकार, कुशल वादक, कलाकुशल नृत्यांगना, नादमधूर गायिका आणि सौंदर्यशाली पण्यांगना ह्यांनीं हें स्थल भरगच्च भरून गेलेलें आहे. ह्यांपैकीं बहुतेक लोक मुंबापुरींतच असतात. कारण त्यांच्या अप्रतिम गुणाचें चिज होण्यासारखी परिस्थिति गोमांतकांत नाहीं. ह्या लोकांना आपल्या प्रांताविषयीं व देवीविषयीं जाज्वल्य अभिमान आहे.

### शिक्षणप्रसारकसंस्था.

कांहीं महिन्यांपूर्वीं येथें स्थापन झालेली वरील नांवाची संस्था जोमदार रीतीनें चालू आहे. या संस्थेचे कार्यवाह श्री. विष्णु गोविंद पाटील हे कळकळीचे व उत्साही कार्यकर्ते असून त्यांचा कार्याचा उरकहि दांडगा आहे. संस्थेनें चालविलेल्या विद्यालयांत आजमितीस बरींच मुलें आहेत. ही संस्था कांहींवर्षेंपर्यंत जर अशीच जोमानें चालाली तर गोमांतकांतील चार पांच महत्वाच्या संस्थांत आणखी एका संस्थेची भर पडल्यासारखें होईल.

### बोरी.

येथील सावकार घराणें आपल्या औदार्याबद्दल सबंध गोमांतकांत महशूर आहे. हें घराणें भट्टप्रभूपैकीं असून पद्ये ब्राह्मणांतीलच हा एक पोटभेद आहे. श्रीमंत रघुनाथ शाबा

प्रभु सावकार हे अत्यंत विनयशील असून अतिथीसेवा परायण आहेत. नित्य पांचपंचवीस पाहुण्याची यांच्या घरीं वर्दळ असते. अतिथिसेवेच्या पुरातन परंपरेप्रमाणेंच शिक्षण व वाङमयकार्य करणाऱ्या आधुनिक संस्थास ते सढळ हातानें मदत करीत असतात. ह्यांच्या इतका निगर्वी उदार, परमतासहिष्णु व समाजहितचिंतक पुरुष गोमंतकीय विद्यमान श्रीमंतांत क्वचितच असेल. द्रव्याचा खरा सदुपयोग जर कोठें दिसून येत असेल तर यांच्याच घरीं होय. असला आदर्श पुरुष गोमांतकाला खरोखरच भूषण आहे.

## फोंडें.

हाच गांव अंत्रूज महालाची राजधानी आहे. इतिहासकालीं गोमांतकाचें भवितव्य ठरविणाऱ्या अनेक घडामोडी ह्या गांवांत घडल्या आहेत. ह्या गांवानजीक एका उंच डोंगरावर मर्दनगड नांवाचा किल्ला असून पोर्तुगीज व संभाजीमहाराज ह्यांचा प्रसिद्ध रणसंग्राम येथेंच घडून आला. आतां किल्ला अगदीं मोडकळीस आला आहे पण पूर्वीच्या वैभवाचीं सर्व चिन्हें येथें दिसून येतात. गड चांगला मोऱ्याच्या ठिकाणीं असल्यानें ह्या किल्ल्यावर सत्ता स्थापन केली म्हणजे पूर्वी सर्व अंत्रूज महालावर आधिपत्य करण्यास सोपें जात असे.

### आलमेद कॉलेज. ( फोंडे. )

श्री. रामचंद्र पांडुरंग उर्फ दादासाहेब वैद्य ह्यांच्या

प्रयत्नानें ही संस्था वीस वर्षांपूर्वी स्थापन झाली. श्री. दत्तात्रय विष्णु आपटे व श्री. हरि रघुनाथ फाटक ह्यांच्यासारखे विद्वान व कार्यकर्ते पुणेरी शिक्षक संस्थेंत कार्य करीत असल्यानें संस्था चांगली भरभराटींत होती. तितका जोम जरी प्रस्तुत या संस्थेंत नसला तरी ना. नारायण अनंत बांदोडकर यांच्या देखरेखीखालीं ही संस्था समाधानकारक रीतीनें कार्य करीत आहे. संस्थेंत असलेले बहुतेक सर्व शिक्षक आपलें कार्य आस्थेनें व झटून करीत असतात. गोमांतकांतील श्रीमंत, देवालयें आणि फोंड्यांची नगरपालिका ह्यांचें या संस्थेस चांगलें सहाय्य आहे.

### महाराष्ट्र ग्रंथसंग्रहालय. ( फोंडे. )

वरील नांवाची एक संस्था श्री. विनायक काकबा प्रियोळकर व श्री. रामकृष्ण अनंत भांडारी ह्यांच्या नेतृत्वाखालीं येथें चालू असून त्या संस्थेचा ग्रंथसंग्रहहि पुष्कळ आहे. कांहीं वर्षांमागें स्वयंसेवक नांवाचें एक उत्तम मासिक श्री. प्रियोळकर यांच्या संपादकत्वाखालीं प्रसिद्ध होत होतें. आतां तें साप्ताहिक रूपांत प्रसिद्ध होत आहे. श्री. प्रियोळकर हे उत्कृष्ट कवि व प्रतिभावन लेखक असल्यानें गोमांतकांत एका अत्युत्तम साप्ताहिकाची भर पडली आहे, यांत संशय नाहीं.

## कैवल्यपूर. ( विद्यमान श्रीस्वामीमहाराज. )



येथें गौडपादाचार्यांचा आद्यमठ असून त्याची गेल्या दोन वर्षांपूर्वीं चांगली दुरुस्ती करण्यांत आल्यामुळें मठाची इमारत भव्य आणि शोभिवंत दिसते. पीठावर सध्यां विद्यमान असलेले **श्रीपूर्णानंद सरस्वति** हे विद्वान, कार्यदक्ष व धर्मपरायण असे आचार्य आहेत. आधुनिक, राजकीय व सामाजिक घडामोडींचें त्यांना सूक्ष्म ज्ञान आहे. यामुळें प्रगतिपथांत त्यांचें पाऊल नेहमीं पुढें असतें. भारतवर्षानें जगांतील राष्ट्रांच्या शर्यतींत आस्थेनें भाग घेऊन त्यांत अग्रेसरत्व संपादन केल्याशिवाय तरणोपाय नाहीं असें त्यांचें मत आहे.

## कवळें—श्रीशांतादुर्गा.



सारस्वत ब्राम्हणांतील एका महत्वाच्या वर्गाची ही कुलदेवी आहे. पूर्वीं हिचें स्थान सासष्टींतील केळोशी ऊर्फ कर्दली या गावीं होतें. बाटाबाटीच्या वेळीं तिचें तेथून या गांवीं स्थलांतर करण्यांत आलें. ह्या देवीचें मंदिर भव्य व नयनमनोहर असून दोन्ही बाजूंच्या विस्तृत अग्रशालांमुळें ह्या देवालयाला विलक्षण शोभा आली आहे. देवालयापुढें रस्त्याला लागूनच सुंदर पुष्करणी असून त्यांत हमेशा पडलेलें देवालयाचें प्रतिबिंब नयनाल्हादकारक दिसतें. येथें

असलेल्या सोयींमुळें गोमांतकांत यापूर्वी भरलेल्या महत्वाच्या सभा येथेंच पार पडलेल्या आहेत.

## वांदीवडें

श्रीरामनाथ, श्रीमहालक्ष्मी व श्रीनागेश या देवांचीं भव्य व सुशोभित देवालयें या गांवांत आहेत. तीन्हीहि सारस्वत ब्राम्हणाचे कुलदेव असून त्यांच्या महाजनांची संख्याहि पुष्कळ आहे. नागेशाच्या देवालयासमोर सोंधेकरांचा राजवाडा आहे. आतां सामान्य जमीनदाराइतकेंहि त्यांना उत्पन्न नाहीं. उत्तर कानडा जिल्ह्यांत संवदें ह्मणून जो गांव आहे तेथें पूर्वीं यांची राजधानी होती. जातीनें हे लिंगाईत आहेत.

## म्हाडदोळ. ( श्रीमहालसा. )



गोमांतकांत प्रसिद्ध असलेलें महालसादेवीचें मंदिर या ठिकाणीं आहे. अंत्रूज महालांत हें स्थान मध्यवर्ती असल्यानें पूर्वीं महालाचें हेंच मुख्य ठिकाण होतें. म्हाडदोळची जत्रा महाराष्ट्रांत सुप्रसिद्ध आहे; पूर्वीप्रमाणें तिचें महत्व आतां राहिलेलें नाहीं. येथें श्रीह्मालसा विद्यामंदिर या नांवाची एक संस्था असून तिचे कार्यवाह श्री. सच्चिदानंद ह्माडदोळकर हे आपलें कार्य आस्थेनें करीत असतात. श्रीम्हालसेचें देवालय प्रशस्त शोभिवंत व भव्य असून बांधणी जुन्या तऱ्हेची आहे.

## प्रियोळ विद्याभुवन.

वरील नांवाची एक संस्था या गांवांत चांगल्या रीतीनें चालू आहे. संस्था सरकारांत रजिष्टर झालेली असून प्रियोळ गांवच्या मध्यभागीं तिनें स्वतःची एक सुंदर इमारत उभारली आहे. श्री. घारू पुंडलिक केळेकर हे उत्साही तरुण या संस्थेकरितां अश्रांत परिश्रम करीत असतात. " आरंभशूरः खलु दाक्षिणात्या " अशी स्थिति होऊं नये ह्मणून संस्थेचा वार्षिक खर्च कायम फंडाच्या व्याजावर चालविण्याची संस्थेनें घेतलेली दक्षता अत्यंत दूरदर्शीपणाची आहे. पावसाळ्यांत उगवणाऱ्या झुडुपांप्रमाणें निसर्गक्रमानें कालाच्या आधिन होण्यापेक्षां थोड्याच संस्था जन्मास येऊन त्या जास्त काल टिकून राहणें हें कोणत्याहि प्रांतास जास्त भूषणभूत आहे यांत संशयच नाहीं.


## कुंडई.

हा गांव जुवारी नदीवर वसलेला असून निसर्गसौंदर्यानें परिपूर्ण आहे. गांवात एक चांगली संस्था असून ती सुद्दिपद्दा. वर चाललेली आहे. त्या संस्थेचे अध्यक्ष श्री. फटबा केशव कामत हे कळकळीचे कार्यकर्ते असून संस्थेच्या कार्यांत आपुलकीच्या भावनेनें फार परिश्रम घेत असतात. संस्थेतर्फे एक विद्यालय व एक वाचनालय चालू आहे संस्था जर अशीच टिकून राहिली तर त्या योगानें गांवची चांगली शैक्षणिक प्रगति होईल असें वाटतें.

## वेलिंग.

श्रीनरसिंहाचें देवालय ह्या ठिकाणीं आहे. समोरच देवालयाची पुष्करिणी असून तींत गोमुखींतून एका स्वच्छ व मधुर निर्झराचें पाणी पडत असतें. झऱ्याचें पाणी अतिशय पाचक असून त्यांत रोगनाशक गुण आहे असें सांगतात. जवळच सरस्वती विद्यालय नावांची एक मोफत शाळा आहे. श्रीमती सरस्वतीबाई वेलिंगकर या बाई त्या विद्यालयाचा सर्व खर्च करीत असतात. इमारत चांगली शोभिवंत आहे. गोमांतकीय धनिकांस हें उदाहरण खरोखरच अनुकरणीय आहे.

## मंगेशी.



श्रीमंगेशाच्या निवासस्थानावरून प्रियोळच्या ह्या भागाला

मंगेशी असें नांव पडलें. देवालय जरी छोटें असलें तरी अत्यंत सुंदर व चित्ताल्हादक आहे. गोमांतकांतील सर्व देवालयांत हें देवालय जास्त श्रीमान आहे. इतकी स्वच्छता व टापटीप भारतवर्षांतील अन्य कोणत्याही देवस्थानांतून दिसून येत नाहीं असा तज्ञांचा अभिप्राय आहे. देवालयाचें कार्यकारीमंडळ आपल्या कार्यांत दक्ष असल्यानें कोणत्याही बाबतींत येथें सुव्यवस्था दिसून येते. आग्रशाला विशाल व हवाशीर असल्यानें गोमांतकाबाहेरील महाजनांची चांगली सोय झाली आहे. या एकाच देवालयावरून गोमांतकीयांचा व्यवस्थितपणा व स्वच्छतेची आवड परप्रांतस्थांच्या निदर्शनास आल्याशिवाय रहात नाहीं. देवालयाच्या तर्फे एक वाचनालय आणि एक विद्यालय चालू आहे.

## मनमोहन कार्यालय.

गेल्या वर्षापासून हें मासिक मंगेशी येथें निघत असतें. या मासिकाचे संपादक श्री. महादेव कृष्ण अभिषेकी हे उत्साही, कार्यतत्पर, मनमिळाऊ व वाङ्मयाभिलाषि तरुण आहेत. मासिकाचें धोरणही व्यवस्थित असून लेखांची निवडही चांगली करण्यांत येते. गोमांतकाच्या तिकुल परिस्थितींत मासिक प्रसिद्ध करण्याची धडाडी दाखविणें हेंच आधीं विशेष आहे. जनतेची सहानुभूती मिळवून हें मासिक संपादक यशस्वी करून दाखवितील अशी आशा करण्यास पुष्कळ जागा आहे.

## वेरें.



हा गांव अंत्रूजच्या उत्तर सीमेवर मांडवी नदीस लागून आहे. येथील श्रीअनंताचें देवालय अत्यंत मनोहर असून आसमंतांतील देखावा प्रेक्षणीय दिसतो. पोफळीच्या आगरांनी हा गांव एखाद्या उपवनाप्रमाणें भासतो. ह्या झाडांना बहर आला म्हणजे त्यांच्या सुवासानें आसमंतांतील प्रदेश नुसता दरवळून जातो. येथील प्रसिद्ध श्रीमान गृहस्थ श्री. रघुनाथ विष्णु पै रायकर यांच्या आश्रयाखालीं श्री. अनंत विद्यालय नावांची एक शाळा येथें चालू आहे. सृष्टीसौंदर्याच्या भोक्त्यांनीं हा गांव—विशेषतः ह्या गांवांतील सावई नामक भाग—एकवार पाहून तेथें वास्तव्य करण्यासारखा आहे.

## माशेल.

महाशैल—मोठा पर्वत—या शब्दाचा माशेल हा अपभ्रंश आहे. कांहींच्या मतें पूर्वीं येथें एक महाशाला—महाविद्यालय होतें त्यावरून या गांवाला माशेल असें नांव पडलें. कसेंही जरी असलें तरी विद्वानाची वास्तव्यभूमी ह्मणून प्राचीनकालापासून गोमांतकांत हा गांव प्रसिद्ध आहे. त्याचप्रमाणें हा गांव देवालयांनीं नुसता फुलून गेला आहे. आजही येथें

पुष्कळ विद्वानाची वस्ती आहे. श्री. मल्लिनाथ विद्यालय नावांची येथें एक चांगली संस्था असून तिचें कार्य समाधानकारक रीतीनें चालू आहे. प्रो. शांब शंकर सुकठणकर प्रो. भवानी शंकरशास्त्री सुकठणकर; श्री. रामचंद्र वामन करंडेशास्त्री; श्री. अनंत यज्ञेश्वर धूपकरशास्त्री इत्यादि प्रसिद्ध गोमांतकीय विद्वान याच गांवचे होत. अमरकोशावर संस्कृत टीका करणारे प्रसिद्ध कवि महेश्वरभट्ट सुकठणकर येथेंच होऊन गेले.

## मडकई.



हा गांव चांगला सुपीक असून येथील नवदुर्गेचें देवालय मनोहर व आल्हाददायक आहे. देवालय डोंगराच्या पायथ्यावर बांधलेलें असल्यानें तेथून आसमंतांतील सस्यशामल क्षेत्रांचा व अर्धचंद्राकृती जुवारी नदीचा देखावा अत्यंत नयनमनोहर दिसतो. ग्रामसंस्थेतर्फे या गांवांत एक उत्कृष्ट विद्यालय चालू आहे या विद्यालयांत शंभरांवर मुलें शिक्षण घेत असतात. त्याचप्रमाणें संस्थेतर्फे एक वाचनालयही चालू आहे. आपल्या संघटितपणामुळें हा गांव गोमांतकाला आदर्शभूत आहे. या संघटित कार्याचें बहुतेक सर्व श्रेय या गांवचे सन्मान्य पुढारी श्री. अनंत जिवोत्तम कामत यांना आहे.

## शस्त्रकला. ( मडकई. )

चाकू, कात्या, सुरे बंदुका वगैरे हत्यारें येथें उत्तम प्रकारचीं करतात. परकीय मालानें गोमांतकाचे बाजार भरगच्च भरलेले असतांहि परकीय कलकौशल्यावरहि मात करून आपली कर्तबगारी दाखविणें हें कार्य किती साहसाचें आहे याची कोणालाही कल्पना होईल. अंत्रूज महालांत विणकाम करणारे मागांचे कारखानें पुष्कळ आहेत. या कारखान्यांतून सुती व रेशमी कापड सुबक निवतें. महायुद्धामुळें कापडाला तेजी आली त्या वेळीं हे कारखानें भरभराटींत होते पण सध्यां कापडाच्या किंमती उतरल्या असल्यानें हा धंदा डबघाईस येत चालला आहे.

## गोवाबेट.

ह्याच बेटावरून सबंध प्रांताला गोवा असें संबोधन आहे. प्राचीनकालापासून सबंध कोकणपटीचीं सूत्रें ह्याच बेटांतून हालत होतीं. कदंब, शिलाहार, यादव आणि आदीलशहा यांच्या ताब्यांत असलेल्या. कोकणाच्या उभय राजधान्या याच बेटांत आहेत. प्राचीनकाळीं भारतविख्यात असलेलें गोपकपट्टण ऊर्फ गोपकपूर हें शहर या बेटाच्या दक्षिण सीमेवर होतें. आतां त्या भूमीला थोरलें गोवें अशी संज्ञा आहे. पोर्तुगीजांच्या प्रारंभीच्या अमदानींत भरभराटींत असलेलें गोवा शहर ह्या बेटाच्या उत्तर सीमेवर आहे. यालाच या शहरांत असलेल्या अपार श्रीमंतीवरून " सोन्याचें गोवें " अशी संज्ञा होती. प्रस्तुत या स्थानाला जुने गोवें असें ह्मण-

तात. कारण पणजी शहराला "नवीन गोवें" हें नामाभिधान मुक्रर केल्यामुळें हें विध्वंस झालेलें शहर साहजिकपणेंच जुनें झालें.

## कुंभारजुवें.

कोंकणी भाषेंत जुवें म्हणजे बेट. नदीपलीकडे असलेल्या महाविद्यालयांतील कुंभार येथें निवास करीत असल्यामुळें या गांवाला वरील नांव पडलें. गोवा शहराच्या भरभराटीच्यावेळीं सारस्वत ब्राम्हणांतील बहुतेक श्रीमंत व्यापारी या बेटांत निवास करीत असत. यामुळें कित्येक शतकांपासून श्रीमंतीविषयीं या गांवाची कीर्ति गोमांतकांत गाजत आहे. श्रीमंत ब्राम्हण घराण्यांची वस्ती या गावांत पुष्कळ होती; पण हळु हळु ती संपुष्टांत येत चालली आहे.

### शारदाविद्यालय. ( कुंभारजुवें. )



गोमांतकांतील चार दोन प्रमुख विद्यालयांत या विद्यालयाची गणना होते. संस्थेचे मुख्याध्यापक श्री. गणेश शिवराम सामंत हे विद्वान. कर्तबगार व आस्थेवाईक असल्यानें संस्थेची दिवसेंदिवस भरभराट होत चालली आहे. संस्थेनें अत्यंत परिश्रमानें गोमांतकांत व गोमांतकाबाहेर फंड जमवून बांधलेली इमारत पुरी होत आली असून साहित्यपरि-

षदेच्या सुमारास तींत प्रवेश करण्याचा समारंभ होईल असें ह्मणतात. श्रीशांतादुर्गा वाचनमंदिर नावाचें एक वाचनमंदिर या गांवीं असून तें चांगलें जोमानें चाललें आहे. मंदिरांत दुर्मिळ व निवडक पुस्तकांचा चांगला संग्रह आहे. त्याच प्रमाणें कर्णधार नावाचें एक हस्तलिखीत मासिक तरुण-वर्गानें चालविलें असून त्यांत उद्बोधक व सुविचारपरिप्लुत लेख येत असतात. अशा प्रकारचीं हस्तलिखीत मासिकें कुंकळ्ळी, मडगांव, शिरोडें, मडकई, सांखळी, पणजी, डिचोली वगैरे गांवीं निघत असलेलीं आह्मी पाहिलीं आहेत परंतु भाषेच्या दृष्टीनें हेंच सर्वांत उत्तम वाटल्यानें मुद्दाम उल्लेख केला आहे.

## शिल्पकला. ( कुंभारजुवें. )

नवीन फॅशनच्या सुंदर टोप्या बनविण्यांचा ह्या गांवीं एक कारखाना आहे. त्यांत सर्व प्रकारच्या व निरनिराळ्या आकाराच्या टोप्या बनविण्यांत येतात, तसेंच या गावांत नावा बांधण्याचा धंदा मोठ्या प्रमाणांत चालतो. ह्या गावांत नाविक लोकांची पुष्कळ वस्ती आहे. दर्यावर्दीपणांत हे लोक कुशल असून ते पश्चिम समुद्रावर दूरवरपर्यंत सफरी करीत असतात. मोठ्या गलबतांनीं चालणारा बहुतेक व्यापार परकीय सरकारनें बुडविल्यामुळें आतां लहानसहान सफरींवरच यांना संतुष्ट रहावें लागत आहे.

## जुनें गोवें.

कुमारजुव्याहून पणजीला जातांना वाटेंत मध्यावर ह्या विध्वंसित शहराची भूमि दृष्टीस पडते. हें शहर पूर्वी कुमार-

जुव्यांच्या खाडीपासून रायबंदरच्या पांट्यापर्यंत पसरलें होतें आणि या शहरांत पांच लक्ष लोकवस्ती होती; पण तें सर्व वैभव आतां लयास जाऊन कांहीं मोडकळीस आलेल्या ख्रिस्तीधर्ममठांशिवाय आज तेथें कांहीं दिसत नाहीं. से नांवाचें ख्रिस्ती चर्च, सेंट असीसचा मठ, सेंट फ्रांसिस्कझेवियर याचें थडगें इत्यादि कांहीं भव्य इमारती पूर्वीं येथें महान शहर होतें अशी साक्ष प्रेक्षकाच्या मनाला पटवितात. सेंट फ्रांसिस्क झेवियर याचें थडगें खेरीजकरून उरलेल्या तिन्ही इमारतींत पूर्वीं हिंदु देवालयें होतीं असें सांगतात आणि तद्दर्शक कांहीं खुणाहि या मंदिरांत आढळून येतात. सर्व मंदिरें सुंदर, भव्य आणि प्रेक्षणीय आहेत. सेंट फ्रांसिस्कचें शव अजूनहि ताजें आहे अशी भाविक ख्रिस्ती लोकांची भावना असल्यानें शवाच्या उद्‌घाटन प्रसंगीं भारतवर्षाच्या दूरदूरच्या प्रांतांतून या स्थळाची यात्रा करण्याकरितां पुष्कळ ख्रिस्ती लोकांची गर्दी लोटते. गोव्याच्या धक्क्यावर उतरतांच आफोंस द आंलबुकेर्कची प्रेक्षणिय कमान दृष्टीस पडते.

## गोमांतकीय हिंदुसभा.

गोमांतकीय हिंदूंच्या सर्वांगिण उन्नतीकरितां मडगांव येथें मोठी सभा भरून श्री. रामचंद्र वामन करंडे यांच्या अध्यक्षतेखालीं पावणेदोन वर्षांपूर्वीं ही संस्था स्थापन करण्यांत आली. हिंदूचे संपादक श्री दत्तात्रय व्यंकटेश पै हे त्या सभेचे कार्यवाह आहेत. गोमांतकांतील अनेक गावांत या संस्थेचीं ग्राममंडळें स्थापन झालेलीं आहेत व त्यांच्यामार्फत शुद्धि, संघटन, अस्पृश्योद्धार वगैरे उपयुक्त कार्यें चालू आहेत.

संस्थेचें नियम, घटना व कार्यपद्धति कोणत्याहि अन्य संस्थेनें कित्ता घेण्यासारखी आहे.

**अखिल भारतीय हिंदु महासभेची गोमांतक शाखा.**

ही संस्था सप्टंबर १९२८ मध्यें स्थापन झाली असून हिंदुमहासभेच्या नियमाप्रमाणें ती दिल्लीच्या वरिष्ट संस्थेस जोडण्यांत आली आहे. गोमांतकाचे सुप्रसिद्ध पुढारी श्री. गोविंद पुंडलीक हेगडे देसाई हे तिचे अध्यक्ष आहेत. संस्थेचे हजारों सभासद असून या संस्थेनें थोडयाच कालांत आठशें गावडयांचें शुद्धिकरण करून त्यांना हिंदुधर्मांत प्रविष्ट केलें आहे. हिंदुधर्माचीं उज्ज्वल तत्वें नवहिंदूंच्या मनावर बिंबविण्याकरितां गोसप्ताह, सरस्वत्युत्सव, गीताजयंत्युत्सव, दासनवमी वगैरे उत्सव नवहिंदूंच्या वस्तींत ठिकठिकाणीं या संस्थेतर्फे साजरे केले जातात. ज्या ठिकाणीं शुद्धीची मुहूर्तमेढ रोवण्यांत आली त्या चिंबल गांवांत नवहिंदूंच्या उपयोगाकरितां एक पतितपावनाचें मंदिर या संस्थेनें उभारलेलें आहे. संस्थेचे कार्यवाह श्री. रामचंद्र नाराण लवंदे यांनीं स्वार्थत्यागपूर्वक संस्थेच्याच कार्यास आपणास वाहून घेतलें आहे.

## रायबंदर.

राय—म्हणजे राजा. गोव्यांच्या भरभराटीच्यावेळीं हेंच बंदर मुख्य असल्यानें त्याला रायबंदर असें नांव पडलें. मिजिकोर्दि या ख्रिस्तीलोकांनीं चालविलेल्या संस्थेचें भव्य रुग्णालय, अनाथालय वगैरे प्रेक्षणीय इमारती या गांवांत आहेत. मडगांवच्या ओस्पिस या संस्थेप्रमाणें हीहि संस्था

लॉटरीच्या तिकिटांवर चालली असून हिंदुलोकांना या संस्थेंत मज्जाव आहे. गांवांत हिंदुलोकांनीं चालविलेलें एक वाचनालय व एक विद्यालय असून सार्वजनिक कार्यांत दक्षतेनें भाग घेणारे गोमांतकीय शुद्धीचे कर्मवीर श्री. रामचंद्र नारायण लवंदे यांच्या नेतृत्वाखालीं उभय संस्था समाधानकारकरीतीनें चालू आहेत.

## शिल्पकला ( रायबंदर ).

हिंदु व ख्रिस्ती देवादिकांच्या सुंदर मूर्ति घडविण्यांत येथील कारागिर अत्यंत प्रविण आहेत. मुंबईसारख्या कलाकौशल्याच्या माहेरघरीं येथें निर्माण झालेल्या निरनिराळ्याप्रकारच्या मूर्तींचा दांडगा खप होतो. गोमांतकीय कलेच्या उन्नत्यर्थ अहर्निश झटणाऱ्या श्री. लवंद्यांचें उद्योगभवन प्रेक्षणीय आहे. हरएक प्रकारच्या पावडरी, रंग, तेलें आणि आसवें येथें तयार होतात. येथें हिंदुलोकांनीं चालविलेले दोन छापखानेंहि आहेत.

## पणजी.

हें शहर सध्यां गोमांतकाची राजधानी आहे. मुंबई सोडून दिल्यास सबंध दक्षिण हिंदुस्थानांत इतकें सुंदर शहर दुसरें नाहीं. स्वच्छ व रुंद रस्ते, भव्य व विस्तृत इमारती आणि हवाशीर मांडवी नदी यायोगानें ह्या शहराला अपूर्व शोभा आली आहे. मांडवीनदीचें सान्निध्य असल्यानें येथें व्यापारहि चांगला चालतो. लिसेवनामक पोर्तुगीज पाठशाळा, मेडिकल विद्यालय, नॉर्मल नामक ट्रेनिंग कॉलेज इत्यादि

पोर्तुगीज सरकारचीं मुख्य विद्यालयें येथें असल्यानें या शहरांत सुशिक्षित प्रोफेसरांचा व विद्यार्थ्यांचा फार मोठा भरणा निरंतर असतो.

### श्रीमहालक्ष्मीमंदिर ( पणजी ).



हें देवालय विस्तृत व सुशोभित असून आग्रशालादी सर्व सरंजामानें मंडित आहे. ह्याच देवालयाजवळ दोन तीन वर्षांपूर्वी बांधलेलें हनुमानाचेंही आणखी एक लहानसें देवालय आहे. श्रीमहालक्ष्मीमंदिरांतच पणजीच्या बहुतेक सर्व सार्वजनिक सभा पार पडल्या जातात. कांहीं महिन्यांपूर्वी देवालयाच्या बाबतींत ब्राह्मणब्राह्मणेतर वादास गोमांतकांत तोंड फुटल्यापासून ब्राह्मणेतरांनीं या देवालयावर बहिष्कार घातला आहे. हिंदूचे बहुतेक सर्व धार्मिक उत्सव येथें साजरे केले जातात.

### मुष्टिफंड संस्था (पणजी).

ही संस्था वीस वर्षांपूर्वीं येथें चालू झाली. दीर्घ कालपर्यंत हिचें कार्य नेटानें चालू आहे. संस्थेच्या मालकीचें एक भव्य व नयनमनोहर विद्यालय असून संस्थेमार्फत अनेक विद्यालयांनीं तीनशें विद्यार्थी शिक्षण घेत असतात. श्रीमान व

उदार गृहस्थांनीं या संस्थेस पुष्कळ देणग्या दिलेल्या असून प्रो. रामचंद्र शंकर नाईक या विद्वान व कर्तबगार गृहस्थांच्या नेतृत्वाखालीं ही संस्था दिवसेंदिवस ऊर्जितावस्थेस येत चालली आहे.

**श्रीसरस्वतीमंदीर ( पणजी ).**





ह्या नांवाचें वाचनालय आज कित्येक वर्षांपासून चालू आहे. वाचनालयांत वाचकांची मनस्वी गर्दी असते, ग्रंथसंग्रह भरपूर असून व्यवस्था चोख आहे. नाभिक समाजाचेंहि श्रीमहालक्ष्मीप्रासादिक, वाचनमंदिर नांवाचें वाचनालय चालू आहे. त्याचीहि व्यवस्था ठीक आहे.

**गोमांतक साहित्यसेवक मंडळ ( पणजी ).**

ही संस्था गेल्या वर्षींच पणजी येथें स्थापन झाली आहे. यंदा गोमांतकांत भरणारें साहित्यसंमेलन या संस्थेच्याच विद्यमानें भरत आहे या संस्थेंत गोमांतकांतील ठिकठिकाणच्या ठळक ठळक विद्वानांचा भरणा झालेला आहे. साहित्यासारख्या गंभिर व उपयुक्त विषयाचा विचार करून त्याच्या वर्धनाकरितां प्रयत्न करण्याकरतां सर्व गोमांतकाची मिळून एक संस्था असणें अत्यंतावश्यक होते. ती उणीव या संस्थेनें भरून काढिली आहे. साहिस्यसंमेलनासारखें उपयुक्त व महत्वाचें कार्य संस्थेनें आपल्या शिरावर घेतलें आहे. यावरून

संस्थेच्या कार्याची दिशा चांगली कळून येतें. संस्थेचे कार्यवाह श्री. शिवा फटू पै **आंगले** हें सूज्ञ, वाङ्मयाभिलाषी, मनमिळाऊ व कर्तबगार आहेत. त्यांनीं हातांत घेतलेलें कार्य चांगल्या रीतीनें तडीस जाईल यांत मुळींच संशय नाहीं.

## सच्चिदानंद मंडळ. ( पणजी. )

गोमांतकांतील तरुणांची उन्नति विशेषतः शारीरिक उन्नति करण्याकरितां या मंडळाची स्थापना चार वर्षांमागें पणजींत करण्यांत आली. या संस्थेच्या सदस्यांत बहुतेक महालांतील लोकांचा भरणा असल्यानें ही संस्था सबंध गोमांतकाची आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. संस्थेतर्फे मर्दानी खेळाचे व कुस्ती, मुष्टियुद्ध, पोहणें इत्यादि मर्दानी कलेचे सामने करून बक्षिसें वाटण्यांत येतात. त्याचप्रमाणें गांवोगांवीं व्यायामशाला स्थापन करून शारीरिक शिक्षणाचा प्रसार करण्यांत येत असतो. संस्थेचे कार्यवाह श्री० लक्ष्मण श्रीपाद **सरदेसाई** हे चांगले कळकळीचे कार्यकर्ते असल्यानें संस्थेचें कार्य आस्थेनें करीत असतात.

## हिंदु फार्मसी. ( पणजी. )

श्री. रामचंद्र पांडुरंग वैद्य यांनीं बरेच दिवसांपासून येथें हिंदु फार्मसी उघडल्यामुळें आर्यवैद्यकाधारें औषध घेणारांची फार चांगली सोय झाली आहे. फार दिवसांचा अनुभव आणि पिढीजाद धंदा असल्यामुळें मोठमोठे युरोपियनसुद्धां यांचीं औषधें घेतात व परदेशींही मागवीत असतात.

## कालापूर.

हा गांव पणजीपासून दोन मैलांवर आहे. गोमांतकांतील प्रसिद्ध श्रीमान धेपे यांचा या गांवांत असलेला वाडा प्रेक्षणीय व सुंदर आहे. धेम्प्याची दानशूरता गोमांतकांत महशूर आहे. गोमांतकभूषण श्री. पुरुषोत्तमबाबा केंकरे यांचाहि एक भव्य व सुशोभित बंगला या गांवीं असून त्यांचे नातु व गोमांतकांतील हिंदुमहासभेचे अध्यक्ष रामचंद्र बाबा केंकरे हे त्या ठिकाणीं सध्यां निवास करीत असतात. ह्या गांवांत नवहिंदु गावड्यांची पुष्कळ वसती आहे. त्यांच्या करितां **विनायकबोवा मसूरकर** यांनीं स्थापन केलेली येथें एक शाळा आहे ती आपलें कार्य समाधानकारक रीतीनें बजावीत असते.

## चिंबल.



**रघुपति राघव राजाराम । पतीतपावन सीताराम ॥**

गोमांतकांतील शुद्धीची मुहूर्तभेट याच गांवीं रोवली जाऊन गोमांतकाच्या इतिहासांतील ही अभूतपूर्व घटना येथेंच घडून आली. ज्या स्थानावर पहिला शुद्धिसमारंभ उरकण्यांत आला तेथें पूर्वीं श्रीभगवति देवीचें देवालय होतें. त्या देवीचा तलाव अजूनहि तेथें विद्यमान आहे. गोमांतकाच्या अर्वाचीन इतिहासांत या स्थानाला अत्यंत महत्व आल्याशिवाय राहणार नाहीं. शुद्धिकृतांच्या उपयोगाकरितां पतितपावनाचें एक सुंदर देवालय गोमांतकीय हिंदु महासभेच्या मार्फत या गांवांत उभारण्यांत आलें आहे.

# ८—बारदेश महाल.

या भागांत पोर्तुगीज अमलापूर्वी बारा देशकती होत्या म्हणून ह्या महालाला बारदेश असें नांव पडलें. ह्या महालाची एकंदर लोसंख्या १०६५३१ आहे. त्यांत अधिक लोक ख्रिस्ती आहेत, शिक्षण, कलाकौशल्य आणि कर्तबगारी यांत या भागांतील लोक बरेच पुढारलेले आहेत. आणि गोमांतकांतील सर्व महालांत हा महाल अत्यंत सुपीक आहे. बारदेशी स्त्रियांची सौंदर्याबद्दल गोमांतकांत जास्त प्रसिद्धी आहे. सन १७४१ सालीं हा प्रांत पोर्तुगीजांनीं सावंतवाडीकरांकडून जिंकून घेतला.

## म्हापसें.

हें शहर बारदेश प्रांताची राजधानीं आहे. हें एका सुंदर टेंकडीवर वसलेलें असल्यानें अत्यंत हवाशीर आहे. येथील लोक कलाकौशल्याबद्दल संपूर्ण गोमांतकांत प्रसिद्ध आहेत. प्रत्येक जातीचे कलाकौशल्याचे पदार्थ येथें निर्माण होतात; पण आमचा स्वाभिमान नाशाच्या इतक्या परिसीमेस गेला आहे कीं, Made in Farmany असा ट्रेडमार्क त्या मालावर असल्याशिवाय त्या मालाचा खप मुळींच होत नाहीं. हिंदुस्थानांत उत्पन्न होणारी प्रत्येक वस्तु घाणेरडी असलीच पाहिजे अशी बहुतेक हिंदपुत्रांची समजूत असल्यानें तूर्तच्या परिस्थितींत तरी असला खोटेपणा पत्करल्याशिवाय गत्यंतर नाहीं. म्हापशाची एकंदर लोकवस्ती १० हजार आहे. घरें सुंदर, सुशोभित व भव्य असून रस्तेहि चागले रुंद आहेत. गोमांतकांत या शहराचा क्रमांक तिसरा लागतो.

## सारस्वत विद्यालय. ( म्हापसें. )

म्हापशें येथें १९१० सालीं भरलेल्या सारस्वतांच्या संयुक्त परिषदेंत या विद्यालयाची योजना मुक्रर करण्यांत आली. तूर्त गोमांतकांतील सर्व मराठी विद्यालयांत ह्या विद्यालयाचा क्रमांक पहिला लागतो. शहराच्या मध्यभागींच संस्थेच्या मालकीची एक सुंदर व विस्तृत इमारत असून या संस्थेंतील शिक्षकवर्गहि होतकरू व आस्थेवाईक आहे. ह्या मंदिराच्या एका दालनांत वाचनालयाची सोय केलेली आहे. वाचनालयांत चांगला ग्रंथसंग्रह असून मराठी, पोर्तुगीज व इंग्रजी या भाषांतील प्रसिद्ध नियतकालिकें तेथें येत असतात. संस्थेचे होतकरू कार्यवाह श्री. मंगेश कृष्ण सरदेसाई यांच्या अश्रांत परिश्रमामुळें संस्थेचें कार्य जोमानें चालू आहे.

## ज्ञानप्रसारकसंघ. ( ह्मापसें. )

ह्या संघांत बहुतेक वैश्यसमाजाचा भरणा आहे. संस्थेच्या विद्यमानें एक विद्यालय व एक वाचनालय चालू असून दोन्हीचेंहि कार्य समाधानकारकरीतीनें चालू आहे. ह्मापशें येथील वैश्यसमाज शिक्षणांत व धनांत पुढारलेला असल्यानें या संघाच्या द्वारें आपली बहुविध उन्नति करून घेण्याचा त्यानें संकल्प केला आहे हें त्या समाजास भूषणावह होय.

## कळंगूट.

ह्मपशांपासून चार मैलांवर समुद्रकिनाऱ्यास हा गांव आहे. गांवांतील एकंदर जनसंख्या दहा हजार असून बहुतेक लोक सुशिक्षित व खाऊनपिऊन सुखी असे आहेत. येथें व्यापारही चांगला चालतो. या गांवांत श्रीशांतादुर्गा विद्यालय नांवाची एक संस्था असून त्या संस्थेचें कार्य

जोमानें चालू आहे. विद्यालयांत सुमारें दिडशें विद्यार्थी असून सर्व शिक्षण मोफत चालू आहे. संस्थेंत असलेले शिक्षक विद्वान व होतकरू असून अत्यंत कळकळीनें विद्यार्थ्यांस शिक्षणदान करीत असतात.

## खोर्ली.

हा गांव ह्मापशाला लागून आहे किंवा ह्मापसें शहराचाच हा एक भाग आहे असें ह्मटल्यास हरकत नाहीं. ह्या गांवांत कासार लोकांची पुष्कळ वस्ती असून तांब्या पितळेचीं भांडीं बनविण्यांत हे लोक पटाईत आहेत. निरनिराळ्या प्रकारच्या सुंदर समया, लामणदिवे, तऱ्हेतऱ्हेचीं देवपूजेचीं उपकरणें यांत्रिक सहाय्याशिवाय येथें बनविण्यांत येतात. भांड्यांवर नक्षीकाम करण्यांतही या लोकांचा हातखंडा आहे. निरनिराळ्या देवतांच्या सुवर्ण आणि रौप्यप्रतिमाही येथें बनविण्यांत येतात.

**श्रीलक्ष्मीनारायण मंदीर.** ( ह्मापसें. )



वरील देवतांचें एक सुंदर मंदिर गेल्या वर्षींच ह्मापशें शहरांत बांधण्यांत आलें असून आधुनिक सर्व सुखसोयींनीं

तें परिपूर्ण झालें आहे. देवालय अंतर्बाह्य संगमरवरानें मढविलेलें आहे; आणि कुलीन स्त्रियांस बसण्याकरितां सज्जाचीहि सोय केली आहे. इतकें सुंदर व टुमदार देवालय सबंध बारदेश महालांत दुसरें नाहीं. ह्मापशेंच्या ब्राह्मणसमाजानें आपसांत वर्गणी जमवून हें देवालय बांधलें आहे. या देवालयामुळें ह्मापशें शहराच्या सौंदर्यांत पुष्कळच भर पडली आहे.

**श्री मारुतीमंदीर.** ( ह्मापसें. )



गोमांतकांत बलभीमाची उपासना फारसी प्रचलित नाहीं **काकोडे** येथील मारुतीगडावर असलेलें हनुमानाचें देवालय, **पणजी** येथें नवीनच बांधलेलें श्री मारुतीमंदिर आणि **म्हापशाचें** मारुतीमंदिर हीं तीनच मारुतीचीं देवालयें गोमांतकांत आहेत आणि तीं सर्वहि अलिकडचीं आहेत. महाराष्ट्रांतील प्रत्येक गावांत एक तरी मारुतीचें देवालय दिसून येतें. श्रीसमर्थांच्या वेळेपासून ही बलभीमाची उपासना महाराष्ट्रांत रूढ झाली. तिचा प्रवेश आतांच कोठें गोमांतकांत होत आहे. ह्मापशाचें हें मारुतिमंदिर भव्य व सुंदर आहे. हें देवालय शहराच्या मध्यभागींच असल्यानें भाविक लोकांचा समुदायही येथें पुष्कळ जमतो.

## पिलेर्ण.

येथें रंगीत सामान उत्तम प्रकारचें होतें. निरनिराळ्या प्रकारचीं मुलांचीं खेळणीं, तसबीरा, पाळणे, पाट, टेबलें वगैरे जिनसा येथें बनविण्यांत येतात आणि संपूर्ण गोमांत-कांत बारदेश महालांतील लोक संपन्न असल्यानें त्या मालाला मागणीहि पुष्कळ आहे. लांकडावर शिल्पकाम करणारे कारा-गीर लोकहि येथें पुष्कळ आहेत. हिंदु व ख्रिस्ती देवतांच्या सुंदर मूर्ति येथें बनविण्यांत येतात.

## सिवोली.

हा गांव सुंदर व प्रेक्षणीय असून नदीच्या सानिध्यामुळें या गांवच्या सौंदर्यांत भरच पडली आहे. येथें आंब्याचा व्यापार फार मोठ्या प्रमाणावर चालतो. गोमांतकीय आंब्याची ख्याति संपूर्ण भारतवर्षांत आहे पण सबंध गोमांतकांत सिवोलीचे आंबे अत्यंत मधुर ह्मणून प्रसिद्ध आहेत. श्री. **लक्ष्मीनारायणा**चें एक सुंदर मंदिर येथें नवीनच बांधलेलें आहे. तें विस्तृत व नयनमनोहर आहे. येथें एक चांगली शिक्षणसंस्था असून डॉ. रामनाथ ना. बाणावलीकर यांच्या नेतृत्वाखालीं तिचें काम समाधानकारकरीतीनें चालू आहे.

## चिखली.

हा सुंदर गांव ह्मापशांच्या उत्तरेस चार मैलांवर नदी-किनाऱ्यावर आहे. समशेरजंग लखबादादा **लाड** ह्यांचें घराणें मूळ ह्याच गांवचें. मग नदीपलीकडे आरोब्यास जाऊन त्यांच्या पूर्वजांनीं वसती केली. 'भांडारकर विद्यालय' ह्या नांवाची एक संस्था येथें समाधानकारकरीतीनें चालू आहे. गांव नदीकिनाऱ्यावर वसलेला असल्यानें येथील

सृष्टीसौंदर्य अत्यंत प्रेक्षणीय दिसतें. गांव जरी लहान असला तरी डॉ. काशिनाथ लक्ष्मण **लाड** ह्यांच्या नेतृत्वामुळें वरील शिक्षणसंस्था आपलें कार्य उत्तम रीतीनें बजावीत असते.

---

# ९–भक्तग्राम महाल.

हा महाल मूळचा सावंवाडीकरांचा, कोल्हापूरच्या छत्रपतीविरुद्ध झालेल्या लढाईंत गोव्यांहून कांहीं फिरंगी सैन्य वाडीकर भोंसल्याच्या मदतीस गेलें होतें. त्या मदतीच्या मोबदल्याबद्दल पेडणें व भक्तग्राम हे दोन महाल कांहीं वर्षांच्या करारानें वाडीकरांनीं फिरंग्यांच्या हवालीं केले पण पाश्चात्यांच्या राजनीतीस अनुसरून हें माशानें गिळलेलें माणिक पुन्हां सावंतवाडीकरांच्या हातास लागलें नाहीं. डिचोली हें ह्या महालाचें मुख्य शहर आहे.

## डिचोली.

पूर्वीं हें शहर फार भरभराटींत होतें. प्राचीनकालीन वैभवाचे अवशेष आजहि तेथें दिसून येतात. गावांतील घरें व्यवस्थेशीर रीतीनें बांधलेलीं दिसून येतात. ह्या नव्या काबीजादींतील शहरांत ख्रिश्चन लोकांचीहि चांगली वस्ती आहे. गांव सुंदर व स्वच्छ असून शहरांत असणाऱ्या सर्व सोयी येथें दिसून येतात. श्रीशिवाजी महाराज व वाडीचे भोंसले ह्यांचें ह्या शहरानजीक एका मैदानावर युद्ध झालें होतें. येथें मातीचीं सुंदर भांडीं करण्याचे कारखानें आहेत. संबंध हिंदुस्थानांत जयपूराशिवाय असलीं सुंदर भांडीं कोठें निपजत नाहींत. या गांवानजीक काजूचे गर काढून परदेशीं पाठविण्याचे दोन कारखानें भरभराटींत चालले आहेत.

## विद्यावर्धक समाज. ( डिचोली. )

ही संस्था कांहीं वर्षांपासून येथें चालू असून तिच्यामार्फत एक मराठी शाळा व एक वाचनालय चालू आहे. गावांत भर मध्यवस्तींत संस्थेच्या मालकीची एक भव्य व सुंदर इमारत आहे. गोमांतकांत ज्या कांहीं शिक्षणविषयक संस्था आहेत त्यांत या संस्थेचा क्रमांक बराच वर लागतो. गोमांतकांतील एक प्रसिद्ध लेखक व आस्थेवाईक कार्यकर्ते श्री. वामन नारायण पालेकर हे या संस्थेच्या भरभराटीकरितां झटून परिश्रम करीत असतात. संस्थेच्या विद्यालयांत सुमारें दिडशें मुलें शिक्षण घेत आहेत. श्री. दुंडापाअण्णा गाडवी हे पणजीचे व्यापारीही या संस्थेसे मदतनीस आहेत.

## लामगांव.

येथें सरकारचे इनामदार विश्वासराव सरदेसाई यांची वस्ती आहे. ह्या घराण्याचे सध्यांचे प्रमुख श्री. नानासाहेब सरदेसाई यांची अचूक तिरंजाईबद्दल मोठी ख्याति आहे. ह्यांच्या इतका बांका तिरंदाज सबंध गोमांतकांत दुसरा नाहीं. सध्यां वृद्धापकालामुळें त्यांच्या अंगांत पूर्वींचें चापल्य राहिलेलें नाहीं. तरी त्यांच्या भव्य देहयष्टिवरून त्यांच्या शौर्याबद्दल गोमांतकांत प्रचलित असलेल्या आख्यायिका खऱ्या आहेत याविषयीं संशय राहत नाहीं. श्रीमंतांचें सौजन्य, गुणग्राहकता व आदरातिथ्य वाखाणण्यासारखें आहे.

## कारापुर.

गोमांतकांतील क्षत्रिय कुलांत सन्मानानें आणि श्रीमंतीनें श्रेष्ठ असलेलें राण्याचें प्रमुख घराणें या गावांत आहे. सध्याचे ग्वाल्हेराधिपति महाराज जयाजीराव शिंदे ह्यांची माता ह्या

घराण्यांतील होय. ह्या घराण्यांतील पुरुषांनीं आपल्या क्षात्रतेजाचा प्रताप कित्येकवेळां पोर्तुगीजांच्या निदर्शनास आणून दिला आहे. ह्या घराण्याचे सध्याचें प्रमुख सरदार जयतोजीराव राणे हे आपल्या पूर्वजांप्रमाणेंच शूर, उदार आणि धर्मपरायण आहेत. धार्मिक व विद्वान लोकांना ह्यांचा चांगला आश्रय असतो.

### श्रीपांडुरंग मंदिर. ( कारापूर. )

सरदार जयतोजीराव राणे ह्यांच्या भव्य वाड्याशेजारींच हें सुंदर देवालय आहे. ह्या देवालयाचा सर्व खर्च सरदार राणे ह्यांच्या खाजगींतून चालतो; श्रीपांडुरंगानें स्वप्नांत दर्शन देऊन राण्याच्या पूर्वजांकडून हें देवालय बांधविलें असें सांगतात. ह्या देवाचें दर्शन घेतल्यास पंढरपूरच्या यात्रेचें पुण्य लागतें अशी आख्यायिका आहे म्हणूनच या गावांला गोमांतकांतील पंढरपूर अशी संज्ञा आहे.

### नारवें.

हाटकेश्वर, सप्तकोटीश्वर इत्यादि गोमांतकांतील पवित्र देवस्थानें या गांवांत आहेत. त्याचप्रमाणें येथें पांच नद्यांचा संगम झाल्यामुळें ह्या पंचगंगा संगमावर स्नान करण्यास श्रा. व॥ ८ मी रोजीं पुष्कळ लोक येत असतात. त्या दिवशीं येथें मोठी जत्रा भरते. श्रीसप्तकोटीश्वराच्या देवालयाशीं गोमांतकाच्या इतिहासाचा निकट संबंध आहे. सध्यां विद्यमान असलेलें देवालय श्रीशिवाजीमहाराजांनीं बांधविलें या अर्थाचा देवालयावर लेख खोदलेला आहे. निसर्ग सौंदर्याच्या दृष्टीनेंहि नारवें हा गांव अत्यंत प्रेक्षणीय आहे.

## कासारपाल.

ह्या गावांत दैवज्ञब्राम्हणांची कुलदेवी श्रीकालिका हिचें सुंदर देवालय आहे. देवालय उंचवट्यावर वसलेलें असल्यानें खालून देवालयाची शोभा अप्रातिम दिसते, नवरात्र, फाल्गुनोत्सव इत्यादि गोमांतकांत प्रचलित असलेले बहुतेक सर्व उत्सव येथें होत असतात.

## शिरगांव.

श्रीलयरायदेवीचें भव्य देवालय या गांवी आहे. येथें वै. शु. ५ मी रोजीं मोठी यात्रा भरते व त्यावेळीं या देवीचे भक्त आगींतून चालून जाण्याचें दिव्य करून दाखवितात. लोकसंख्येनें एवढी मोठी जत्रा गोमांतकांत दुसरी भरत नाहीं. हें मोठें जागृत देवस्थान आहे अशी समजूत आहे. या गांवांत तांब्यापितळेचीं व मातीचीं सुंदर भांडीं बनवितात. जत्रेंत बहुतेक याच जिनसांचा मोठा व्यापार चालतो. नैसर्गिक सौंदर्याच्या दृष्टीनेंहि गांव उत्तम आहे.

## सांखळी.

सांखळी ऊर्फ शृंखळापूर हा गांव पूर्वीं सत्तरीप्रांतांत मोडत होता; पण कांहीं वर्षांमागें पोर्तुगीज सरकारनें भक्तग्राम महालांत त्याचा समावेश केला. गांव विस्तृत असून या गांवांत श्रीमंत सारस्वत ब्राह्मणाची पुष्कळ वस्ती आहे. कांहीं वर्षांमागें घांटावरून लमाणानें येणाऱ्या व्यापारी मालाची ही पेठ होती; पण लमाणांचा व्यापार मोडल्यामुळें आतां या गांवाला व्यापारी दृष्टीनें तितकें महत्व नाहीं; परंतु सर्व सत्तरीमहालांत आयात निर्गत व्यापार याच गांवांतूनचालत असल्यानें आजहि येथेंपुष्कळ व्यापाराची घडामोड चालूअसते.

## श्रीदत्तमंदिर. ( सांखळी )

श्रीदत्तवाडी या नांवानें हें देवालय ओळखलें जातें. देवालयांतील स्वच्छता व पावित्र्य वाखाणण्यासारखें आहे. घाटावरील नृसिंहवाडीच्या दत्ताप्रमाणें या देवाच्या सेवेसहि पुष्कळ आर्त व रोगी लोक येऊन राहतात व श्रीदत्तप्रसादानें दुःखमुक्त होऊन जातात. मुंबईचे सुप्रसिद्ध दानशूर श्रीमंत शांताराम नारायण **दाभोळकर** यांची या देवावर फार भक्ति आहे. जवळच बाबासाहेबांच्या मृत पत्नीचें स्मारक केलेलें आहे. दत्तजयंतीच्या दिवसांत येथे मोठा उत्सव होत असतो. त्या उत्सवाचा सर्व खर्च गोमांतकाचे दानशूर श्रीमंत धेंपे हे चालवितात. देवालय सुंदर व भव्य असून सर्व आधुनिक सुख सोयींनीं परिपूर्ण आहे. या देवालयाच्या आग्रशाळांत बाराहि मास बिऱ्हाडकरूंची गर्दी असते. वारयोषितांच्या संसर्गापासून संबंध गोमांतकांत हेंच एक देवालय मुक्त आहे.

## सन्मित्रसमाज ( सांखळी )

वैश्यसमाजाची संस्था निराळी असल्यानें ह्या संस्थेंत बहुतेक ब्राह्मणांचाच भरणा आहे. संस्थेतर्फे एक वाचनालय व एक विद्यालय चालू असून त्या दोनहि शाखा चांगल्या भरभराटीनें चालल्या आहेत. गांवांतील तरुण वर्गांत शिक्षणविषयक चैतन्य चांगल्याप्रकारें दिसून येतें. गाजावाजा न करितां आस्ते आस्ते उन्नतीचा मार्ग चोखाळण्याचा गांवच्या लोकांनीं चालविलेला उपक्रम स्तुत्य नाहीं असें कोण ह्मणेल?

### श्रीमुरलीधरविद्यालय. ( सांखळी )

श्रीमुरलीधर विद्यालय नांवाची एक शाळा व श्रीमुरलीधर वाचनमंदीर नांवाचें एक वाचनमंदीर अशा दोन संस्था या गांवांतील वैश्यसमाजानें चालविलेल्या आहेत व त्या चांगल्याप्रकारें आपलें काम बजावीत आहेत.

---

## १०–सत्तर महाल.

हा प्रांत डोंगराळ, नापिक असल्यानें परकीय राज्यपद्धतीस कंटाळून या महालांतील लोक पूर्वीं प्रचलित सरकारविरुद्ध वारंवार हातांत शस्त्र धरीत असत. पण आधुनिक वैमानिक युगांत जुन्या काळच्या शस्त्रांनीं सुधारलेल्या सरकारविरुद्ध युद्ध करणें शक्य नसल्यानें ते लोक आतां स्वस्थ आहेत. नाणसाचा कोट, आंब्यांचा गवळ, हरवळेचा दगड, सोंसोगड, मोरलेंगड, करनळे, इत्यादि स्थळें ऐतिहासिक दृष्टीनें महत्वाचीं असल्यानें एकवार पाहण्यासारखीं आहेत. पण तीं स्थळें पाहणें चहापानानें पाप्याचे पितर बनलेल्या आजच्या तरुण पिढीस शक्य नाहीं. धाडसानें तसा कोणी प्रयत्न केल्यास सह्याद्रीच्या उत्तुंग शिखरावर आरोहण केल्याचें श्रेय मिळून सृष्टि-सौंदर्याची मनमुराद लूट करण्यास सांपडेल यांत शंका नाहीं.

### आंबेडें

'सत्तर शिक्षणप्रसारक मंडळ' या नांवाची एक शिक्षण-संस्था या गांवात असून श्री. महादेव सीताराम जोशी यांच्या नेतृत्वाखालीं ती चांगल्या रीतीनें चालली आहे. या महालांत चित्पावन ब्राह्मणाची पुष्कळ वस्ती आहे आणि त्यांच्याच नेतृत्वाखालीं कांहीं सार्वजनिक कार्य होत असतें.

बाकी सगळीकडे सामसुमच आहे. वाळपई हा या महालांतील मुख्य गांव. तेथें मामलेदार कचेरी, पोष्ट ऑफिस, प्राथमिक पोर्तुगीज शाळा, लुझो-मराठी विद्यालय इत्यादि सर्व सोयी आहेत. पण त्या सोयींचा उपभोग घेणारे लोक अगदीं विरल आढळतात.

## ११-पेडणें महाल.

हा महाल खंडणीची बाकी थकल्यामुळें सावंतवाडीकरांकडून थोडया वर्षांच्या करारानें पोर्तुगीजांनीं आपल्या ताब्यांत घेतला होता; पण पोर्तुगीजांच्या सर्वभक्षक नीतिमुळें हा महाल परत सावंतवाडीकरांस मिळाला नाहीं. अजूनही पोर्तुगीज आणि वाडीकर यांच्यांत ह्या महालासंबंधी कांहीं कटकटी चालू आहेत असें ह्मणतात. ह्या महालाची जनसंख्या ३८१२४ असून भूमि सुपीक, हवाशीर व आरोग्यकारक आहे.

### आरोबा.

हें बेट पेडण्याच्या दक्षिणेस आहे. हें एका ब्राह्मण जमीनदाराला इनाम असून त्यानां जसवंतराव असा किताब आहे. आरोब्याचे सध्याचे आधिपति श्रीमंत यशवंतजी जसवंतराव **देसाई** हे विद्वान, उदार व अतिथिसेवापरायण गृहस्थ आहेत. वाङ्मयिक व शैक्षणिक कार्याला ते सढळ हातानें मदत करीत असतात. जमीनदारांचा वाडाहि भव्य, सुंदर व प्रेक्षणिय आहे. वाडयाच्या दोन्ही बाजूंस असलेल्या मनोऱ्यांनीं या वाडयाच्या सौंदर्यांत पुष्कळच भर पडली आहे. गोमांतकाच्या प्राचीन वैभवाचें स्मारक या नात्यानें हें सरदार घराणें गोमांतकास भूषणभूत आहे.

## मोरजी.

हा गांव पेडण्याच्या दक्षिणेस समुद्रकिनाऱ्यावर आहे. गावांत मोरजाई देवीचें भव्य व प्रेक्षणीय देवालय आहे. या गावांत सरस्वतिमंदिर नावांची एक उत्कृष्ट संस्था असून तिचें कार्य व्यवस्थितपणें चाललें आहे. गांवाच्या मध्यभागीं असलेल्या हवाशीर ठिकाणीं संस्थेच्या मालकीची एक विशाल व सुंदर इमारत असून तींत संस्थेचें विद्यालय चालू आहे. मुख्याध्यापक श्री० गोविंदराव पत्की हे विद्वान व कर्तबगार गृहस्थ संस्थेचें कार्य आपुलकीच्या भावनेनें झटून करीत असतात. एवढ्या लहान गांवात इतकें भव्य विद्यालय उभारण्यांत चालकांनीं किती स्वार्थत्याग केला असेल याची कल्पनाच करणें बरें!

## मांद्रें.

हा गांव मोरजी गांवच्या उत्तरेस आहे. श्रीकृष्णविद्यालय नांवाची येथें एक शाळा आहे. विद्यालयाचे शिक्षक श्री. रामचंद्र नारायण **केळकर** हे स्वार्थत्यागी व कार्यदक्ष असून विद्यालयाच्या भरभराटीकरतां अत्यंत परिश्रम करितात. श्री राम मोफत वाचनालय नांवाची एक संस्थाहि आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीनें त्यांनीं चालविली आहे. परिश्रमपूर्वक कार्य केल्यास एकटाच निरालस कार्यकर्ता आपल्या गांवची किती उन्नति करूं शकतो याचें श्री. केळकर हें मूर्तिमंत उदाहरण आहे. गावांतील जुनस या भागांत सारस्वत ब्राह्मणांनीहि चालविलेली एक संस्था आहे.

## हरमल.

येथें श्रीपरशुरामानीं यज्ञ केला होता अशी आख्यायिका आहे. भस्माचा डोंगर ह्मणूर एक उंचवटा दाखवितात. त्या

उंचवटयाची माती खरोखरच राखेसारखी आहे. वालावल येथें असलेला प्रसिद्ध देव श्रीनारायण ह्याचें देवालय पूर्वी या गांवीं होतें. येथील डोंगरांत कांहीं कोरीव गुहाही आहेत. येथें एक शिक्षणसंस्था असून तिच्या तर्फे एक विद्यालय व एक वाचनालय चालू आहे. येथील विद्वान पुढारी श्री. अनंत तातोबा **कामत** ह्यांच्या नेतृत्वाखालीं या संस्थेचें कार्य नेटानें चालू आहे.

## केरी.

बक्षीबहाद्दर जिवबादादा केरकर ह्यांचे वंशज येथें राहतात. घरांतील भाउबंदकीमुळें पूर्वींचें केरकरांचें वैभव आतां राहिलेलें नाहीं. जमीनदारांचा वाडा जुना जरी असला तरी भव्य व प्रेक्षणीय आहे. या घराण्यास फत्तेजंग असा किताब आहे. सध्यांचे जमीनदार विद्याव्यसनी असून गोमांतकांतील उपयुक्त कार्यास ते सढळ हातानें मदत करीत असतात. सारस्वतब्राह्मण व द्रविडब्राह्मण यांच्या परंपरागत द्वेषामुळें ग्वाल्हेरचे दिवाण सर दिनकरराव राजवाडे यांनीं इनाम कमिशनच्या वेळीं केरकरांच्या ग्वाल्हेर संस्थानांत असलेल्या बहुतेक इनाम जमिनी खालसा केल्या. येथें खळनाथ देवाचें एक विशाल व प्रेक्षणीय देवालय आहे.

## पेडणें.

हीच पेडणेमहालाची राजधानी आहे. गोमांतकांतील प्रसिद्ध श्रीमंत रावराजे आत्माराम वासुदेव प्रभु देशप्रभु हे येथीलच रहिवासी होत. पोर्तुगीज सरकारनें यांना व्हायकाउंट असा किताब दिलेला आहे. उभयतां पितापुत्र रावराजे विद्याभिलाषि व सौजन्ययुक्त आहेत. यांचा वाडा अतिशय भव्य असून बहिर्भागांतील कमानीच्या योगानें तो

राजवाड्यासारखा दिसतो. युरोपियन अधिकाऱ्यांच्या पाहुणचाराकरितां वाड्यासमोर बांधलेला बंगलाहि मनोरम आहे. ह्याशिवाय पेडण्यांत अनेक जमीनदारांची वस्ती असून त्यांच्या विशाल वाड्यांमुळें पेडणें गांवाला शहराचें रूप आलेलें आहे; पेडण्याचा दसरा गोमांतकांत प्रसिद्ध आहे. त्या दिवसांत या गांवीं मोठी जत्रा भरते.

## श्रीरवळनाथ मंदिर. ( पेडणे )

वरील नांवाचें देवालय गांवाच्या मध्यभागीं बाजारांतच आहे. देवालय विस्तृत, भव्य व सुंदर आहे. या देवालयाची बांधणी हेमाडपंती थाटाची आहे. येथें प्रतिवर्षीं मोठी जत्रा भरते. पेडणें महाल सर्वसाधारणरीत्या श्रीमंत, उदार व कलाकौशल्यप्रिय असल्यानें ब्रिटिश सत्तेखालीं असलेले पुष्कळ व्यापारी या दिवसांत येथें येऊन व्यापार करितात.

## शीलोन्नति समाज. ( पेडणें. )

ही संस्था कित्येक वर्षांपासून रावराजे काकासाहेब पेडणेकर यांच्या प्रमुखत्वाखालीं येथें चालू आहे. श्री आणि सरस्वती ह्यांचे साहचर्य भारतवर्षांत तरी सहसा दिसून येत नाहीं. कांहीं बंगाली जमीनदार मात्र या विधानाला अपवाद आहेत. रावराजे काकासाहेब देशप्रभु यांच्या ठिकाणी या द्वयींचा संगम झाला आहे. यांनीं कांहीं पुस्तकें लिहिलीं आहेत. त्याचप्रमाणें विद्वानांचाहि हे चांगल्या रीतीनें परामर्श घेतात. या समाजाच्या द्वारें एक चांगलें वाचनमंदिर चालू असून त्यांत उत्तम पुस्तकांचा भरणा आहे. श्रीमंतांचें खाजगी पुस्तकालयही भव्य असून तितका मराठी ग्रंथसंग्रह गोमांतकांत कोणत्याही सद्गृहस्थाच्या घरीं असेल असें वाटत नाहीं.

**श्री सीताराम विद्यालय. ( पेडणे. )**

ह्या विद्यालयाची इमारत श्रीमंत देशप्रभूंच्या भव्य वाड्याजवळ आहे. ही इमारत विशेषतः श्रीमंतांच्याच औदार्यांचें फल आहे. विद्यालय उत्तम हवाशीर जागीं बांधलेलें असून पोर्तुगीज शिक्षणाचीही व्यवस्था त्यांतच केली आहे. गोमांतकांतील शिक्षणसंस्थांत या विद्यालयाचा नंबर बराच वर लागतो. इमारत सुंदर, स्वच्छ व सुशोभित आहे.

**बालोन्नति समाज ( पेडणे. )**

ह्या संस्थेतर्फे एक उत्तम वाचनालय चालू आहे. ह्या संस्थेचे धुरीण श्री. गणेश वामन देशप्रभु हे अत्यंत कळकळीचे समाजसेवक असून सार्वजनिक कार्यांत अत्यंत झीज सोसून झटत असतात. विद्वान, वक्ते व कर्ते लोकसेवक ह्मणून गोमांतकांत ते महशूर आहेत. आपल्या निर्मल आचरणानें पेडण्यांतील बहुसंख्य तरुणावर त्यांचें अतिशय वजन आहे. संस्थेतर्फे विद्वान व्याख्यात्यांचे व्याख्यानादि कार्यक्रम वारंवार होत असतात.

**धारगळ.**

ह्या ठिकाणीं श्रीशांतादुर्गेचें एक सुंदर व भव्य देवालय आहे. ह्यापशें येथील वैश्यसमाजाची ही कुळदेवी होय. देवालयाचा प्राकार, सभामंटप व अग्रशाला विशाल आहे. गोमांतकांत भरलेली वैश्यसमाजाची प्रसिद्ध परिषद् येथेंच भरली होती. देवालयाच्या गच्चीवरून निसर्गाचा देखावा नयनमनोहर व चित्ताल्हादक दिसतो. विशेषतः अर्धचंद्राकृति नदीचा दुरून दिसणारा देखावा तर अत्यन्त प्रेक्षणीय आहे.

समाप्त.

REFBK-0004304